




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा | व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. १६.०९.२०२४ | अंक नं. १६८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर, व्हर्टिकल्स कर्टन्स, क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल, मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लँकेट, सोफा कव्हर्स, योग मॅट

योग दिनानिमित्त योगामॅट रु.१२०/- मध्ये दि.२०,२१,२२ जून पर्यंत

गुलाबचंद कार्पेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५


## समाजाच्या आरक्षणासाठी 'धनगरां'चे १८ सप्टेंबरपासून सामुदायिक उपोषण

### आठ दिवसात प्रमाणपत्र न दिल्यास नदीत उड्या टाकून 'जलसमाधी' घेणार

नगर – धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षण लागू व्हावे, यासाठी १८ सप्टेंबरपासून ७ जण नेवासा फाटा येथे उपोषणास बसणार आहेत. त्यानंतर ८ दिवसात शासनाने निर्णय न घेतल्यास हे सातही जण गोदावरी नदीत उड्या टाकून सामुदायिक जलसमाधी घेणार आहेत, असा इशारा सकल धनगर जमातने दिला आहे. दरम्यान, रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत धनगर समाज आरक्षणाबाबत घेतलेली बैठक आम्हाला मान्य नाही व तिथे त्या बैठकीत सहभागी झालेल्या समाजाच्या शिष्टमंडळाला आमची मान्यता नाही, असे स्पष्टीकरणही सकल धनगर जमातने दिले आहे.

धनगर समाजाला भटके विमुक्त (एनटी) मध्ये साडेतीन टक्के आरक्षण असून एवढेच आरक्षण अनुसूचित जमातीमध्ये (एसटी) मिळावे अशी त्यांची मागणी आहे. २०१४ मध्ये भाजपने सत्तेवर येताच पहिल्या कॅबिनेटमध्ये हे आरक्षण देऊ, अशी ग्वाही दिली होती. मात्र, दहा वर्षात त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे सकल धनगर जमातचे म्हणणे आहे. त्यामुळे या मागणीसाठी व धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षण प्रमाणपत्र मिळण्यासाठी बुधवारपासून नेवासा फाटा येथे संभाजीनगर महामार्गावर उपोषण आंदोलन केले जाणार आहे. यात महाराष्ट्र राज्य धनगर समाज आरक्षण कृती समितीचे जिल्हाध्यक्ष व भाजपचे उत्तर जिल्हा चिटणीस अशोक कोळेकर यांच्यासह प्रल्हाद सोरमारे, बाळासाहेब कोळसे, राजू तागड, देवीलाल मंडलिक, रामराव कोल्हे व भगवान भोजने सहभागी होणार आहेत. उपोषणास बसल्यानंतर आठ दिवसात शासनाने एसटी आरक्षण निर्णय घेतला नाही व प्रमाणपत्र वाटप सुरू केले नाही तर हे सातही जण गोदावरी नदी पात्रात उडी घेऊन जलसमाधी घेणार असल्याचे कोळेकर, तागड आणि सोरमारे यांनी स्पष्ट केले.

(पुढील मजकूर पान २ वर)


SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

यंदाच्या दिवाळी व नवीन वर्षाच्या सहली हाऊसफुल होण्याअगोदरच आजच आपले बुकींग करा..

केरळला चहाच्या मळ्यात रील शुट करताहेत...
दुबईच्या डेझर्टमध्ये फोर व्हिल ड्राईव्ह घेताहेत...
राजस्थानला पिचोला लेक मध्ये बोटिंग करताहेत..
पटाया टॉवरमध्ये जम्पचा रोमांच अनुभवताहेत...

EMI सुविधा उपलब्ध.

| | | |
|---|---|---|
| सिंगापुर मलेशिया थायलंड 1,61,000/- १० दिवस पासुन सुरुवात.. | वाराणसी अयोध्या लखनौ 57,000/- ८ दिवस पासुन सुरुवात.. | बेस्ट ऑफ अंदमान 73,000/- ७ दिवस पासुन सुरुवात. |
| हनिमून शिमला मनाली 35,000/- ६ दिवस पासुन सुरुवात.. | नैनिताल मसुरी कॉर्बेट 41,000/- ६ दिवस पासुन सुरुवात.. | दुबई अबुधाबी 1,05,000/- ७ दिवस पासुन सुरुवात.. |
| राजस्थान मेवाड 47,000/- ९ दिवस पासुन सुरुवात. | सिक्कीम दार्जिलिंग 72,000/- ९ दिवस पासुन सुरुवात. | हायलाईटस् ऑफ केरळ 36,000/- ६ दिवस पासुन सुरुवात. |
| काश्मिर हायलाईटस् 55,000/- ६ दिवस पासुन सुरुवात. | बँकॉक पटाया फुकेत 1,16,000/- ८ दिवस पासुन सुरुवात. | बेस्ट ऑफ नेपाळ 73,000/- ८ दिवस पासुन सुरुवात. |

चलो बॅग भरो निकल पडो..
वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432
लालटाकी रोड, कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, अहमदनगर.


१७ सप्टेंबर २०२४
७४व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
भारताच्या इतिहासातील पहिलेच
नेत्रतज्ज्ञ खासदार डॉ. शिवाजी बंडप्पा काळगे
यांचे
स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा गौरव
पुरस्काराबद्दल हार्दिक अभिनंदन!
* गौरव समारंभ *
हस्ते मा.पोपटरावजी पवार (पद्मश्री)
प्रमुख पाहुणे डॉ. संतोष अग्रवाल, डॉ. प्रकाश मराठे
दिनांक : २२ सप्टेंबर २०२४ संध्या ५ वा
स्थळ : आय एम ए भवन, कल्याण रोड, अ.नगर
मराठवाडा मित्र मंडळ, अ.नगर
डॉ. प्रकाश कांकरिया अध्यक्ष | श्री. सदाशिव मोहिते कार्याध्यक्ष | डॉ. सुधा कांकरिया स्वागताध्यक्ष


११वे पुण्यस्मरण..
आई...
सहवास जरी सुटला तरी
स्मृती सुगंध देत राहील
जीवनाच्या प्रत्येक वळणावर
आई आठवण तुझी येत राहील
आपल्या आत्म्यास शांती लाभो..
स्व. शांताबाई धर्माजी मिसाळ
स्व.दि.१७/९/२०१३
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
* दुःखांकित *
सुरेश धर्माजी मिसाळ
अक्षय सुरेश मिसाळ । मयुर सुरेश मिसाळ । निखिल सुरेश मिसाळ
समस्त मिसाळ परिवार

|| प्रथम पुण्यस्मरण ||

स्व. तुषार सुनिल धाडगे
स्व. दि. २९/०९ /२०२३ तिथी प्रमाणे, मंगळवार- १७/०९/२०२४
दृष्ट लागली सुखाला आमच्यातून नेले तुला,
प्रेम देता-देता आम्हाला, मध्येच हात सुटला खेळ असा नियतीने केला,
दुःख सागरात सोडून दिले आम्हाला
तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली
* दुःखांकित *
सुनिल हरिभाऊ धाडगे
अनिल हरीभाऊ धाडगे
समस्त धाडगे व सर्व मित्र परिवार

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
MAHA offer DiSCOUNT
Just in 1800 Any Course
JOIN TODAY
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, PHOTOSHOP, CORELDRAW, IILUSTRATOR, INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

१८ सप्टें

ह्या जन्मदिनाच्या शुभक्षणांनी
आपली सारी स्वप्न साकार व्हावी
आजचा वाढदिवस आपल्यासाठी
एक अनमोल आठवण आणि
त्या आठवणीने आपलं आयुष्य
अधिकाधिक सुंदर व्हाव...
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
मा. श्री. अविनाश (तात्या) घुले
मा. स्थायी समिती सभापती, म.न.पा. अ.नगर.
(अध्यक्ष : जिल्हा हमाल पंचायत)
* शुभेच्छुक *

आयुष स्वप्निल इथापे

चेतन मारुती जाधव

विशाल मारुती जाधव

अक्षय दिलीप दहातोंडे

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## नगरकरा... जातोय मी.. बघं विचार कर

नगरकरा, दरवर्षीच्या आठवणीने यावर्षीही पुन्हा आलो होतो. पण प्रत्येक वर्षी तुझ्या वर्तणुकीने व्यथितच होतोय.

बस जरा, तन मनानं शांत हो, केवळ मोदक, दुर्वा, शोबाजीने माझी भक्ती करून काय काय नाही मागतो रे तू!

अरे साध्या साध्या वैयक्तिक आणि सामाजिक समस्या तू स्वतः सोडवून घेऊ शकत नाही. त्यासाठी काय मी नगरला यावं का?

तुझ्या नगराचे रस्ते, त्याचे मजबुतीकर, पाणी–वीज–वाहतूक व्यवस्था, प्रगती करण्यासाठीचे नेतृत्व हे प्रश्न सोडवणे हे तुमच्याच हातात आहे.

हो ना जरा धाडसी, विचार ना प्रश्ने संबंधितांना. रडू नको लड! आता तुझ्याकडे नव्याने येणारे तुझे प्रतिनिधी नगर'सेवक' निवडणं तुझ्याच हातात आहे ना.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



बा नगरकरा, उद्याची विसर्जन मिरवणूक तरी भक्तीभावानं होऊ दे! दारू पिऊन नाचत बसला, हिणकस गाणी व नाचगाणे केलेत तरी मी तुला आशीर्वाद द्यायचा का? त्याऐवजी चांगुलपणाच नशा कर.

आपल्या नगरीचा विकास करायचा वाटतं ना? मग स्वतःपासूनच सुरुवात कर. दुसऱ्याचं ओरबडण्यापेक्षा देण्याची मनोवृत्ती तयार कर. मनानं श्रीमंत हो.

रागावलास, नाराज झालास – अरे तुझी भक्तीही स्वार्थी झालीय रे. नेहमीच रडत राहण्यापेक्षा काहीतरी करण्यास पुढे ये – तुला आत्मविश्वास लाभो हाच आशीर्वाद देऊन जातो... पुढील वर्षी पुन्हा यायला...

# अ.ए.सो. हायस्कूल माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी पी. डी. कुलकर्णी तर सचिवपदी सचिन डागा व सहसचिवपदी सरिता पटवर्धन यांची निवड





नगर – अ. ए. सो. च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी यांची, सचिवपदी सचिन डागा व सहसचिवपदी सरिता पटवर्धन यांची निवड करण्यात आली. संघाच्या कार्यकारिणी बैठक संघाचे जेष्ठ सदस्य विलास देवी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

संघाचे अध्यक्ष पद्माकर देशपांडे यांचे निधन झाल्यामुळे कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली. या बैठकीत कै. पद्माकर देशपांडे यांना श्रद्धांजली अर्पण करुन त्यांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

नवनियुक्त अध्यक्ष पी. डी. कुलकर्णी हे गेली ५० वर्षाहून अधिक काळ नगरच्या रंगभूमीवर कार्यरत आहेत. त्यांचे बँकिंग, कला, क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील योगदान सर्वश्रुत आहे. नवनियुक्त सचिव सचिन डागा हे सामाजिक क्षेत्रात अग्रेसर आहेत, तसेच जुन्या नोटा, नाणी, तिकिटे यांचे संग्राहक आहेत. नवनियुक्त सहसचिव सरिता पटवर्धन या सामाजिक क्षेत्रात काम करत असून भरतनाट्यमच्या वेशभूषा करण्यात परिचित आहेत.

नवीन पदाधिकाऱ्यांचा अनुभव विचारात घेता संघाचे काम सक्षमपणे पुढे घेऊन जातील असा विश्वास विलास देवी यांनी व्यक्त केला. किशोर मुनोत, अ‍ॅड. अशोक गांधी, मिलिंद गंधे, राजेंद्र गांधी, राजेंद्र गुजराथी, अविनाश दायमा, सुजित गुगळे, शिरीष कुलकर्णी, विलास देवी यांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.



## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने अनितातार्इ काळे सन्मानित

भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांना धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे झालेल्या काव्य संमेलनात शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे यांच्या हस्ते काळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, काव्य संमेलनाचे अध्यक्ष गीताराम नरवडे, संमेलनाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, साहित्यिक ज्ञानदेव पांडुळे, माजी सरपंच साहेबराव बोडखे, नवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे आदी.

# नोकरी टिकवण्यासाठी शिक्षणसेवकांना द्यावी लागणार आता आणखी एक परीक्षा

**शिक्षक भारतीचा कडाडून विरोध**

नगर – राज्यात राबविल्या जात असलेल्या शिक्षक भरतीतून नियुक्त झालेल्या शिक्षण सेवकांना आता आणखीन एक परीक्षा पास व्हावी लागणार आहे. ही परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास ३ वर्ष शिक्षण सेवक म्हणून काम करणाऱ्या उमेदवारांना आपली नोकरी गमवावी लागणार आहे. याबाबत शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना शिक्षक भारतीने निवेदन देऊन परिपत्रक रद्द करा, अशी मागणी केली असल्याची माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनिल गाडगे यांनी दिली.

तीन वर्षांनी आपसूकच कायमस्वरूपी होणारी नोकरी टिकविणे आता कठीण जाणार असून, शिक्षण सेवकांना या निर्णयाचा मोठा झटका बसणार आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राज्यात नुकतीच शिक्षक भरती पार पडली. यात १४ हजार उमेदवारांना शिक्षण सेवक म्हणून तीन वर्षांची नेमणूक देण्यात आली आहे. तर ५ हजार उमेदवार आजही नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. या आधी तीन वर्षे शिक्षण सेवक म्हणून काम करणाऱ्या उमेदवारांना शिक्षक म्हणून कायम केले जायचे. परंतु आता मात्र तीन वर्षांनंतर त्यांना नियमित शिक्षक म्हणून नियुक्ती दिली जाणार नाही. तर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्वारे त्यांची परीक्षा घेतली जाईल. परीक्षेत उत्तीर्ण झाले तरच त्यांना नोकरीत कायम केले जाणार आहे. अन्यथा या उमेदवारांना नोकरी गमवावी लागणार आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे महत्त्व गेल्या काही वर्षांपासून वाढत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळांबरोबरच सेमी इंग्रजी माध्यमाच्या वर्गामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रवेश घेत असल्याचे चित्र आहे. या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासन आग्रही आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांची गुणवत्ता तपासली जाणार आहे. याला शिक्षक भारतीचा कडाडून विरोध आहे.

शिक्षक बनण्यासाठी उमेदवार टीईटी परीक्षा पास करतात. पवित्र पोर्टलद्वारे भरती प्रक्रिया राबवली जाते. टीईटी परीक्षाही एकप्रकारे स्पर्धात्मक परीक्षा आहे. तसेच या परीक्षेपूर्वीच उमेदवारांनी बी.एड, डी.एड पास केलेली आहे. त्यामुळे अजून एक परीक्षेची आवश्यकता नाही. वरील परिपत्रक रद्द करा अन्यथा राज्यव्यापी आंदोलन केले जाईल, असा इशारा सुनिल गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, सोमनाथ बोंतले, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, कैलास जाधव, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या अध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी दिला.

# मुस्लीम समाजाची नावे मतदार यादीतून कमी करण्याचे नगरमधील विघ्नसंतोषी लोकांचे षडयंत्र


डॉ. परवेज अशरफी

नगर – शासनाला हाताशी धरून काही विघ्नसंतोषी लोक मुस्लीम समाजाची नावे मतदार यादीतून कमी करण्याचे षडयंत्र करत असल्याचे निवेदन एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ.परवेज अशरफी यांनी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री, अल्पसंख्याक आयोग, खा. असद्दुद्दिन अवैसी, एमआयएम प्रदेशाध्यक्ष माजी खा. इम्तियाज जलील, कार्याध्यक्ष डॉ. गफ्फार कादरी यांना दिले आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक लागण्यापूर्वी नवीन मतदार नोंदणी तसेच मतदार यादीत दुरुस्ती आणि हरकती घेण्याचे काम चालू आहे. निवडणूक आयोगात काही सताधारी आणि विरोधकांनी अर्ज करून हरकत नोंदवली असल्याचे समजते. त्या अनुषंगाने अहमदनगरमध्ये लोकसभा निकालानंतर सर्वांचे लक्ष मुस्लिम मतदारांकडे असून, बहुतांश मुस्लिम नागरिकांची नावे वेगवेगळ्या ठिकाणी असल्याचे आणि नाव कमी करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने पत्र पाठवले आहे. त्यात ज्यांनी आक्षेप घेतले त्यांचे नाव आणि का घेतले याची माहिती दिली आहे. ज्या पक्षाला आणि ज्या आघाडीला मुस्लिम समाजाने लोकसभेत निवडून येण्यासाठी आहोरात्र कष्ट केले त्याच पक्षाचे व आघाडीच्या नेत्यांनी मुस्लिम समाजाचे मतदार यादीतून नाव कमी करण्यासाठी आक्षेप किंवा हरकत घेतल्याचे दिसते.

विशेष म्हणजे हरकत घेत असतांना त्यांचे मतदार यादी, मतदार नोंदणी क्रमांक, इपिक क्रमांक सर्व वेगवेगळे असतांना देखील जाणून बुजून घेतल्याचे दिसते. मुस्लिम समाजात एकच नावाचे एक पेक्षा जास्त व्यक्ती असतात त्यामुळे प्रत्येक मतदार यादीत सारखे नाव असण्याची शक्यता आहे. तसेच आम्ही जी नोटीस पाहिली त्यात एकच नावाचे दहा वेगवेगळ्या यादीत नाव असल्याचे पत्र निवडणूक शाखेने दिले आणि कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले. परंतु त्या पत्राला व्यवस्थित पाहिले तर एकच नावाच्या दहा वेगवेगळ्या व्यक्ती असल्याचे निदर्शनास येतेख कारण सर्वांचे मतदार क्रमांक, एपिक क्रमांक, यादी क्रमांक सर्वच वेगळे वेगळे आहे. फक्त आक्षेप घेतल्याकारणाने या सर्वांना नोटीस दिली असल्याचे दिसते. यामागे एकच षडयंत्र म्हणजे एक सारखे वेगवेगळ्या व्यक्तीचे नावावर आक्षेप घेऊन ती सर्व नावे कमी करणे. मुस्लिम समाजात एकच व्यक्तीचे आणि एकाच आडनावाचे असंख्य नागरिक असतात आणि आहे याची शहानिशा आपल्या अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष केली तर लक्षात येईल की हे सर्व व्यक्ती वेगवेगळे असून, फक्त मुस्लीम समाजाचे नाव मतदार यादीतून कमी करण्याच्या हेतूने षडयंत्र या लोकांनी केले असल्याचे दिसत आहे.

या षडयंत्राचे भागीदार न होता आपल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यामार्फत निष्पक्ष चौकशी करून मतदार यादीतून मुस्लीम समाजाची नावे कमी करण्याच्या षडयंत्राला हाणून पडावे. वेगवेगळ्या यादीत एकसारखे असलेले नाव तसेच अबाधित ठेवावे, ही मागणी डॉ. परवेज अशरफी यांनी शासनाच्या विविध मंत्र्याकडे व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## हिसका मारून महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र पळविले

नगर – कॉलनीमध्ये फेरफटका मारत असलेल्या वृध्द महिलेच्या गळ्यातील चार तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरील दोघांनी ओरबाडून नेले. सावेडी उपनगरातील नवलेनगर परिसरात शनिवारी (दि.१४) सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात दोन चोरट्यांविरूध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंदा मधुकर रोहकले (वय ६३, रा. बीएसएनएल ऑफिस समोर, नवलेनगर, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्या बीएसएनएल ऑफिसमधून सन २०२० मध्ये सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्या शनिवारी सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास घरासमोर कॉलनीमध्ये फेरफटका मारत होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्या जवळून गेले व पुढे थोड्या अंतरावर जाऊन पुन्हा मागे वळून फिर्यादी जवळ आले. फिर्यादीला काही कळायच्या आत दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील चार तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र ओरबाडले व दोघे दुचाकीवरून गजानन महाराज मंदिराच्या दिशेने पसार झाले.

फिर्यादीने आरडाओरडा केला असता घटनास्थळी गर्दी जमा झाली. तोफखाना पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी आले. रोहकले यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

# राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान द्यावे

नगर – राज्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांना आपल्याच सरकारने ११६० कोटी रूपयांची तरतूद करत १६ वर्ष विनावेतन कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन सुरू केले आहे याबद्दल आपले खरे तर आभार व्यक्त करावे तेवढे थोडेच आहे. परंतु या अल्पशा वेतनामुळे आजच्या महागाईच्या वणव्यात जीवन जगण्यासाठी कसरत करावी लागते आहे.

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६५ हजार विना तथा अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासन निर्णय १५ नोव्हेंबर २०१५ व ४ जून २०१४ मधील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करत या शाळांना १ जानेवारी २४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करणे, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ फेब्रुवारी २१ च्या शासननिर्णयान्वये शासन स्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ लागू करणे यासह इतर मागण्या साठी शिक्षक समन्वय संघावतीने मुंबईतील आझाद मैदानावर १६ ऑगस्ट पासून हुंकार बेमुदत आंदोलन सुरू आहे.

राज्यातील 'कायम' शब्द काढलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यावर सुमारे ६५ हजार शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी 'पंधरा ते वीस' वर्षा पासून काही 'विनावेतन' तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार, आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस–वीस वर्षे झाली तरी विनावेतन राबवून घ्यायचे. एव्हढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही, या वेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्या १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करत आहोत. त्यामुळे शिक्षकांच्या मागण्यांचा अंत न पाहता खालील मागण्या बाबत पालक सरकार म्हणुन आपण यथोचीत न्याय कराल

१) अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांना १ जानेवारी २०२४ पासुन शासननिर्णय १५ नोव्हेंबर २०११ व ४ जून २०१४ मधील तरतुदीनुसार प्रतिवर्षी विना अट टप्पा वाढ लागू करणे.

२) शासनाच्या चुकीमुळे शासननिर्णय १२, १५ व २४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसाच्या आत शासनस्तरावर त्रुटी पूर्तता केलेल्या प्राथ, माध्य, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना समान टप्पावाढ देणे.

३) राज्यातील पुणे स्तरावरावरील अघोषित शाळांना अनुदानास पात्र करून वेतन अनुदान मंजूर करणे. या मागणीसाठी शिक्षक भारती विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले.

यावेळी महिला आघाडी राज्याध्यक्षा रुपालीताई कुरुमकर, राज्याध्यक्ष जयवंत भाबड, राज्याकार्याध्यक्ष राहुल पाटील, महेश पाडेकर, पदाधिकारी उपस्थित होते.

# पेमराज सारडा महाविद्यालयात ९ ऑक्टोबर रोजी राज्यस्तरीय शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धा

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय शारदा करंडक व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धांचे आयोजन ९ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात सकाळी ९:३० वाजता स्पर्धाचे उद्घाटन होणार आहे. त्याच दिवशी स्पर्धा संपल्यावर सायंकाळी ५ वाजता स्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार आहे. स्पर्धे तील सांघिक विजेत्यांना आकर्षक रौप्य शारदा व ज्ञानेश्वर करंडकासह रोख पारितोषिके देण्यात येणार असून वैयक्तिक विजेत्यांनाही रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली.

शारदा करंडक वाद स्पर्धा ही वरिष्ठ महाविद्यालयासाठी असून यासाठी 'सोशल मीडिया मध्ये अडकलेली तरुणाई वास्तवाचे भान हरवत आहे' हा विषय देण्यात आला आहे. तसेच ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धा ही कनिष्ठ महाविद्यालया साठी असून यासाठी 'स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी सरकार पेक्षा संस्कारच महत्वाचे आहे' हा विषय देण्यात आला आहे. शारदा करंडक व ज्ञानेश्वर करंडक या दोन्ही स्पर्धा वेगवेगळ्या असून महाविद्यालयांनी दोन्ही स्पर्धांसाठी स्वतंत्र संघ पाठवावा. प्रत्येक संघात प्रस्तावाच्या बाजूने बोलणारा एक व प्रस्तावाच्या विरोधात बोलणारा एक असे दोन विद्यार्थी असतील. स्पर्धेसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यम राहील. प्रत्येक स्पर्धकाला १० मिनिटे (८+२) वेळ दिला जाईल, अशी माहिती उपप्राचार्य मिलिंद देशपांडे यांनी दिली.

शारदा करंडक स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या संघाला रुपये ५००१ व शारदा देवीची मूर्तीचा रजत भव्य करंडक. तसेच ज्ञानेश्वर करंडक स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्या संघाला रुपये ५००१ रोख व संत ज्ञानेश्वर महाराजांची चांदीची मूर्ती असलेला भव्य करंडक प्रदान करण्यात येईल.

याशिवाय दोन्ही सोर्धेतील द्वितीय क्रमांकास रु.३००१ रोख व रौप्य करंडक, तृतीय रु.२००१ रोख व रौप्य करंडक तसेच वैयक्तिक विजेत्यांना प्रथम रु.२००१, द्वितीय रु १५०० व तृतीय रु.११०० रोख देण्यात येणार आहेत.

याशिवाय परिक्षकांच्या शिफारसी वरून ५०१ रुपयांची उत्तेजनार्थ तीन पारितोषिके देण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी मोबाईल नंबर ९७६३४४४८०८ येथे संपर्क साधावा, अशी माहिती उपप्राचार्य डॉ.मंगला भोसले यांनी दिली.

या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी होऊन ही स्पर्धा यशस्वी करावी, असे आवाहन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष अ‍ॅड. अनंत फडणीस, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी यांनी केले आहे. प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजन सुरु आहे. यासाठी प्रबंधक अशोक असेरी, पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत, प्रा.डॉ.राजू रिक्कल व प्रा.गिरीष पाखरे, शारदा करंडकाचे निमंत्रक प्रा.डॉ.राजेंद्र मारवाडे व ज्ञानेश्वर करंडकाचे निमंत्रक प्रा.गोपीनाथ होले आदी प्रयत्नशील आहेत.

## मिराभाई शेख यांचे अल्प आजाराने निधन



नगर – खडकी खंडाळा येथील रहिवासी मिराभाई फत्तुभाई शेख (वय ६२) यांचे १४ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी खडकी खंडाळा येथील दावलमलिक कब्रस्तान येथे करण्यात आला.

त्यांच्या मागे १ भाऊ, २ बहिणी, ३ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## विजय वाघमारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – माळीचिंचोरा, घोडेगाव, वडाळा येथील रहिवासी विजय दशरथ वाघमारे (वय ३५) यांचे १६ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर माळीचिंचोरे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ भाऊ, भाऊजय, २ मुली असा परिवार आहे.

## किशोर महाले यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील अशोक सह. साखर कारखान्याचे माजी कर्मचारी किशोर सरुनाथ महाले (वय ७०) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सराफ व्यावसायिक महेश, राजेंद्र व गजानन महाले यांचे वडील होत.

## गळफास घेवून युवकाची आत्महत्या

नगर –एमआयडीसी परिसरात दुध डेअरी चौक, वडगाव गुप्ता (ता. नगर) येथे भाडोत्री रूमवर राहत असलेल्या युवकाने रूममध्येच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (दि.१४) सायंकाळी उघडकीस आली. गुरूनाथ विष्णुदास चढवाल (वय २१, मुळ रा. धरणी, जि. लातुर, हल्ली रा. दुध डेअरी चौक, वडगाव गुप्ता) असे मयत युवकाचे नाव आहे.

गुरूनाथ चढवाल हा विकास राजेंद्र चव्हाण (रा. दुध डेअरी चौक, वडगाव गुप्ता) याच्यासह भाडोत्री रूमवर राहत होते. गुरूनाथ याने शनिवारी त्या रूमवरच गळफास घेतला. सदरचा प्रकार विकास चव्हाण यांच्या सायंकाळी लक्षात आल्यानंतर त्यांनी गुरूनाथला उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात नेले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. ढगे यांनी तपासणी केली असता गुरूनाथचा मृत्यू झाला असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## आरक्षणासाठी 'धनगरां'चे १८ सप्टेंबरपासून सामुदायिक उपोषण

(पान १ वरुन)

या सात जणांपैकी राजू तागड यांनी मागील वर्षी १७ सप्टेंबरला मिरी (ता. पाथर्डी) येथील वीरभद्र मंदिरात याच मागणीसाठी तेरा दिवस उपोषण केले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याशी संपर्क साधून पन्नास दिवसात मार्ग काढू, असे आश्वासन दिले होते. मात्र, वर्ष झाले तरी निर्णय झालेला नाही, असा उद्वेग तागड यांनी व्यक्त केला.

### १० वर्षांपासून तेच ऐकतोय

या संदर्भात सोरमारे यांनी सांगितले की, मागील महिन्यात पुण्यात झालेल्या बैठकीत संभाजीनगर किंवा राहुरी येथे उपोषण करण्याचा निर्णय झाला होता. मात्र काही जणांनी अचानक पंढरपूरला उपोषण सुरू केले व आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाची बैठक घेऊन धनगर आरक्षणाचा विषय कायद्याच्या चौकटीत बसवू, असे आश्वासन दिले. मात्र मागील दहा वर्षापासून आम्ही हेच शब्द ऐकतोय, अशी खंत व्यक्त करून सोरमारे म्हणाले, महाराष्ट्रात धनगर समाज दोन नंबरचा मोठा समाज आहे व आरक्षणाच्या आशेने त्याने भाजपला एकगठ्ठा मतदान केले आहे. मात्र आरक्षणाचा निर्णय अजूनही झालेला नाही. त्यामुळे आता धनगरी हिसका दाखवला जाणार आहे व १८ सप्टेंबरपासून उपोषण आणि सामुदायिक जलसमाधी आंदोलन केले जाणार आहे, असा इशारा त्यांनी दिला.

### शिष्टमंडळच मान्य नाही

मुख्यमंत्र्यांच्या बैठकीस गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, मंत्री चंद्रकांत पाटील, शंभूराज देसाई व अन्य उपस्थित होते. सकल धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने या बैठकीस जायलाच नको होते. या शिष्टमंडळाला समाजाची मान्यताच नाही, असा दावाही सोरमारे यांनी केला.





बारा बलुतेदार व त्यासंबंधी काम करणाऱ्या कारागिर व व्यावसायिकांना चालना देण्यासाठी केंद्र स्तर राबवित असलेल्या विश्वकर्मा योजनेचे उद्घाटन करताना भाजपचे प्रा. भानुदास बेरड. समवेत अधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात लाभार्थी महिला.

# जन शिक्षण संस्थेत विश्वकर्मा योजना व स्वच्छता पंधरवड्याचे उद्घाटन

## पारंपारिक व्यवसायांना मिळणार आधुनिक प्रशिक्षणाची जोड व आर्थिक सहाय्य, महिला-युवतींसह युवकांचा सहभाग

नगर - बारा बलुतेदार व त्यासंबंधी काम करणाऱ्या लहान मोठे कारागीर आणि व्यावसायिकांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारने राबविलेल्या विश्वकर्मा योजनेचे उद्घाटन शहरातील जन शिक्षण संस्थेत करण्यात आले. तसेच यावेळी स्वच्छता अभियान पंधरवड्याचा शुभारंभ करुन सार्वजनिक स्वच्छतेची शपथ घेण्यात आली.

अभियानाचे उद्घाटन भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा. भानुदास बेरड यांच्या हस्ते झाले. यावेळी विश्वकर्माचे डिस्ट्रिक्ट प्रोजेक्ट मॅनेजर मनीषा गालफाडे, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे कौशल्य अभियान अधिकारी संकेत पगारे, जन शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार, कार्यक्रम अधिकारी शफाकत सय्यद, कुंदा शिंदे, लेखापाल अनिल तांदळे आदींसह लाभार्थी महिला व युवक उपस्थित होते.

प्रास्ताविकात बाळासाहेब पवार म्हणाले की, आजही समाजात बारा बलुतेदारांचे पारंपारिक पध्दतीने काम सुरु आहे. त्याकामाला अद्यावत तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यामध्ये नाविन्य आणून पारंपारिक व्यावसायिकांना सक्षमपणे उभे करण्याच्या दृष्टीकोनाने राबविण्यात आलेली विश्वकर्मा योजना दिशादर्शक आहे. यामुळे पारंपारिक व्यवसायाला चालना मिळून सशक्त भारत घडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संकेत पगारे यांनी विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींची नोंदणी, यामध्ये १८ प्रकारच्या ट्रेडचा असलेला समावेश, पाच दिवस ट्रेनिंग व सहाव्या दिवशी परीक्षा घेतली जात असल्याची माहिती दिली. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या लाभार्थींना पाच टक्के दराने नॅशनल बँकेतून कर्ज, पाचशे रुपये दिवसाप्रमाणे ३००० रुपयांपर्यंतचे स्टायपेंड व १५ हजार रुपयांचे टूल्स किट देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

भानुदास बेरड म्हणाले की, कोणत्याही जातीचे व्यक्ती स्वत:मध्ये असलेल्या कौशल्यावर आधारीत या योजनेचा लाभ घेऊ शकतो. जातीविरहित ही योजना राबविण्यात आली आहे. गोरगरिबांच्या हाताला काम व कौशल्य निर्माण करण्याचे काम या योजनेद्वारे होणार आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर भाजप कार्य करत असून, शेवटच्या रांगेतील शेवटच्या माणसापर्यंत सत्तेचा लाभ मिळावा या दृष्टिकोनाने कार्य सुरू आहे. प्राचीन काळातील आर्किटेक्ट असलेले विश्वकर्मा यांनी द्वारकानगरी उभारली त्यांच्या नावाने ही योजना सुरु करण्यात आली आहे. प्रत्येक लाभार्थ्यांनी ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून या योजनेचा लाभ घ्यावा व प्रचार प्रसार करुन गरजूंपर्यंत ही योजना पोहोचवण्याचे त्यांनी आवाहन केले.

जन शिक्षण संस्थेत विश्वकर्मा योजनेतंर्गत सलून सेवा बेसिक ट्रेनिग या ट्रेडसाठी प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले. या योजनेसाठी ४५ लाभार्थींची निवड करण्यात आली आहे. तर संस्थेच्यावतीने स्वच्छता अभियान पंधरवड्याचा शुभारंभ करण्यात आला असून, २ ऑक्टोबरपर्यंत स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच लाभार्थींना एक पेड मा के नाम! संकल्पनेने एक झाड लावण्याचे आवाहन करण्यात आले. सूत्रसंचालन कुंदा शिंदे यांनी केले. आभार शफाकत सय्यद यांनी मानले.

# चर्मकार विकास संघाच्या शिष्टमंडळाची विविध प्रश्नांवर मुख्य सचिवांशी चर्चा

### राज्याच्या प्रथम महिला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचा सन्मान



विविध प्रश्नांवर मुख्य सचिवांशी चर्चा करताना चर्मकार विकास संघाचे शिष्टमंडळ.

नगर - चर्मकार विकास संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या प्रथम महिला मुख्यसचिव सुजाता सौनिक यांचा सन्मान करण्यात आला. तर चर्मकार समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

चर्मकार विकास संघाच्या शिष्टमंडळाने सौनिक यांची मंत्रालयात नुकतीच भेट घेतली. यावेळी चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, मुंबई प्रदेशाध्यक्ष सुभाष मराठे, नगरसेविका आशाताई मराठे, महिला कार्याध्यक्षा पुजाताई कांबळे, डॉ. प्रवीण धाडवे (परभणी) आदी उपस्थित होते.

चर्मकार विकास संघाच्या वतीने संत रविदास महाराज यांच्या जयंतीची शासकीय सुट्टी द्यावी, संत रविदास महाराज यांचे महाराष्ट्रातील जिल्हास्तरावर स्मारक व विकास केंद्र उभारण्यात यावे, चर्मोद्योग महामंडळाचे सर्व थकीत कर्ज सरसकट विनाशर्त माफ व्हावे, कष्टकरी गटई कामगारांना महानगरपालिका क्षेत्रात तसेच इतर सर्व शहर व गाव पातळीवर अधिकृत पीच परवाना (गटई स्टॉल) देण्यात यावे, अपघात विमा, आरोग्य विमा, पेन्शन योजना, घरकुल योजनेचा लाभ मिळावा, चर्मोद्योग महामंडळाचे सर्व कर्ज महामंडळाच्या मार्फत देण्यात यावे व जाचक अटी रद्द कराव्या, देवनार (मुंबई) येथील आधुनिक लेदर पार्कला निधी उपलब्ध करून लेदर पार्कच्या कामाला सुरूवात करावी, महाराष्ट्र राज्य बाल चित्रकला स्पर्धेत चर्मकार समाजाबद्दल असंविधानिक शब्दाचा उल्लेख करणाऱ्या दोषी अधिकारीवर कठोर कारवाई करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

या प्रश्नांसह प्रामुख्याने युवक व महिलांच्या विकास, न्याहक्क व सन्मानाच्या विविध प्रश्नावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. याप्रसंगी सुजाता सौनिक यांनी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिष्टमंडळास आश्वासन दिले. सौनिक यांना संत गुरु रविदास महाराज यांची मूर्ती भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



आडसुळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व डायरेक्टर डॉक्टर प्रदीप पाटील यांना आदर्श प्राचार्य पुरस्काराने सन्मानित करताना माणिकराव विधाते. यावेळी सागर गुंजाळ, सुशील शिंदे, वैभव ढाकणे, कृष्णा आडसुळ व सर्व विभाग प्रमुख.

# 'आडसूळ कॉलेजचे डॉ. प्रदीप एम. पाटील यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार

नगर - साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था अंतर्गत आडसूळ टेक्निकल कॅम्पस मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली यंत्रणा आणि दूरदृष्टी असलेले प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील सर यांचे ८०% विद्यार्थ्यांना चांगल्या पगाराची नोकरी देण्याचे, १५% विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेऊन सरकारी नोकरीत किंवा हायर एजुकेशनला जाण्यासाठी व ५% विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय उभा करून देऊन १००% विद्यार्थ्यांना स्वतः च्या पायावर उभ्या करण्याचे पूर्णत्वास आलेले स्वप्न यामुळे आडसूळ संकुल हे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरले आहे. या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटीने एप्रिल/मे २०२४ मध्ये घेतलेल्या परीक्षेमध्ये महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.

त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन आ. संग्राम जगताप फोंडेशन यांच्या वतीने प्रा. माणिकराव विधाते, राष्ट्रवादी युवक संघटनेचे अध्यक्ष सागर गुंजाळ आणि वैभव ढाकणे यांनी आडसूळ कॉलेजचे प्राचार्य व डायरेक्टर डॉ. प्रदीप एम. पाटील यांचा १५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय अभियंता दिनानिमित्त आदर्श प्राचार्य पुरस्कार देऊन गौरव केला.

# 'मानाचा गणपती विनायकराजं प्रतिष्ठाण' मध्ये पैठणीची सम्राज्ञी, शिवकालीन प्रात्यक्षिके, खेळ, सेल्फ डिफेन्स, ढोल पथक कार्यक्रम

नगर - गुलमोहर रोड येथे मानाचा गणपतीचा मान मिळालेल्या विनायकराजं प्रतिष्ठाण मध्ये कोण बनेल पैठणीची सम्राज्ञी, शिवकालीन मर्दानी खेळ, महिलांसाठी सेल्फ डिफेन्स प्रात्यक्षिके, ढोल पथकांचा गजरमध्ये ४ दिवसांपासून रोज गणेशोत्सव निमित्त कार्यक्रम सादर झाले. यावेळी प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष विपुल वाखुरे पाटिल व उपाध्यक्ष विनय वाखुरे पाटिल उपस्थित होते. 'कोण बनेल पैठणीची सम्राज्ञी' कार्यक्रमाला गुलमोहर रोड भागातील महिलांनी प्रतिसाद देत आनंद लुटला.

महिलांसाठी विशेष कार्यक्रम घेतल्या बद्दल व महिलांच्या कला गुणांना वाव दिल्याबद्दल आभार व्यक्त केले, आणि पैठणीच्या मानकरी सौ. प्राची निलेश देशमुख झाल्या. द्वितीय क्रमांक सौ. गायकवाड व तृतीय क्रमांक सौ. राठोड यांना मिळाला.

सूत्रसंचालन सौ.दिप्ती शुक्रे यांनी करत उपस्थिताची मनं जिंकली मर्दानी खेळाचे नियोजन दरेकर मॅडम यांनी केले तर गणांत पथकांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रतिष्ठाणचे सदस्य उपस्थित होते.



मानाचा गणपती विनायकराजं प्रतिष्ठाण मध्ये पैठणीची सम्राज्ञी, शिवकालीन प्रात्यक्षिके, खेळ, सेल्फ डिफेन्स, ढोल पथक, कार्यक्रम सादर करण्यात आले.

यावेळी विपुल वाखुरे पाटिल आणि विनय वाखुरे पाटिल यांनी आभार मानले. गेल्या १६ वर्षापासुन सावेडीमधील लोकप्रिय असे मंडळ आणि स्थानिक रहिवासी असलेले लोकांचे हक्काचे मानले जाणारे विनायकराजं प्रतिष्ठाणचे विपुल वाखुरे पाटिल यांनी गुलमोहर रोड येथील रिद्धी-सिद्धी कॉलनीमधून सुरवात केली, पण कार्यक्रम करण्यासाठी जागा अपुरी पडत असल्या कारणाने गेल्या १२ वर्षापासुन गुलमोहर रोड येथे विनायकराजं प्रतिष्ठाण चौक येथे स्थापना करण्याचे सर्व ज्येष्ठ मंडळी आणि सदस्यांनी ठरवले. आता १७ वे वर्ष असल्या कारणाने सर्व आठवणींना उजाळा देत आनंद व्यक्त केला.

यावेळी महेश थोरात, अनिल लगड, निखिल मोयल, सुरज लोखंडे, बेरड, गर्जे, प्रदिप वाखुरे, सचिन निक्रड, ओम जरे पा., रुपेश कपिले, प्रार्थ दळवी, अभिजित पाटील, सागर ठाकुर, महेश डोके, मयुर कुलकर्णी, ॲड. भरत शिंदे, संदिप यादव, पांडुरंग कोलते, अनंत कोलते, निलेश तिमोने, प्रंशात दारकुंडे, रुपेश कपिले, प्रदिप कांडेकर, संग्राम केदार, अर्थव शेलार, सौरभ डोंगरे उपस्थित होते

# रक्तदान शिबिरे काळाची गरज

## माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांचे प्रतिपादन; टिळक रोड येथे गणेश उत्सवानिमित्त शनेश्वर प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

नगर - धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्य आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असतात. त्यामुळे विविध आजारपणाला सामोरे जावे लागत आहे. बहुतांश रुग्णांना रक्ताची गरज पडत असते. दिवसेंदिवस रक्तपेढीमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असून रुग्णांच्या नातेवाईकांना संकटांना सामोरे जावे लागत असते. यासाठी आजच्या युवा पिढीने सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान शिबिरांचे आयोजन करून मोठ्या संख्येने रक्तदान करावे. लोकमान्य टिळक मित्र मंडळाचे गेल्या ११ वर्षांपासून रक्तदान शिबिर व वृक्षारोप व संवर्धनाचे काम अखंडितपणे सुरू आहे. असे प्रतिपादन माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांनी केले.



टिळक रोड येथे गणेश उत्सवानिमित्त शनेश्वर प्रतिष्ठान व लोकमान्य टिळक मित्र मंडळ आयोजित रक्तदान शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना माजी उपमहापौर अनिल बोरुडे. समवेत मंडळ व प्रतिष्ठानचे पदाधिकारी

टिळक रोड येथे गणेश उत्सवानिमित्त शनेश्वर प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन झाले. यावेळी अनिल बोरुडे, मंडळाचे मार्गदर्शक गोरख पडोळे, अक्षय गाडळकर, विकी कानडे, पोपट निमसे, विनायक गाडळकर, अमित कानडे, श्रेयस पडोळे, कृष्णा गाडळकर, चेतन कानडे, रोहित पडोळे, विशाल कारखिले, विकास पटवेकर, मनोज लाटे, प्रदीप कुसळकर, ओम कानडे, प्रवीण जाधव आदी उपस्थित होते.

लोकमान्य टिळक मित्र मंडळ वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवीत असतात. श्री गणेश उत्सव निमित्त मंडळाच्या वतीने दरवर्षी आध्यात्मिक, धार्मिक, समाज प्रबोधन पर ऐतिहासिक देखावे सादर करीत समाजामध्ये आपली परंपरा व संस्कृती जोपासण्यासाठी काम केले जात असते. या माध्यमातून समाज जोडला जात असून एकोपा निर्माण होत असतो. लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या वतीने स्व.गणेश कानडे, स्व.सारंग जाधव, स्व.सुनील कानडे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करत आपले कर्तव्य पार पाडले आहे.

युवकांनी पुढाकार घेऊन रक्तदान शिबिरे ही लोक चळवळ व्हावी यासाठी काम करावे, असे मत मंडळाचे मार्गदर्शक गोरख पडोळे यांनी केले.



सावेडी येथील श्रमिकनगर मधील संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त ६२ युवकांनी करुन सामाजिक संदेश दिला. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्यावतीने गणेश उत्सवनिमित्त ६२ युवकांचे रक्तदान

नगर - सावेडी येथील श्रमिकनगर मधील संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त ६२ युवकांनी करुन सामाजिक संदेश दिला. गणेश उत्सवानिमित्त प्रतिष्ठानच्यावतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन नगरसवेक मनोज दुलम यांच्या हस्ते श्री गणेशांची महाआरती करुन करण्यात आली.

यावेळी अष्टविनायक ब्लड बँकेचे नरेश मेरगू म्हणाले की, अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमध्ये योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. त्यामुळे तरुणांनी रक्तदान करणे काळाची गरज आहे. मानवाच्या शरीरामधे साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली. रक्त काढले जाते. प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमध्ये शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांमध्ये रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही.

यावेळी अष्टविनायक ब्लड बँकेचे या शिबीरासाठी सहकार्य लाभले. हे शिबीर यशस्वीतेसाठी संघर्ष प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते त्यांनी परिश्रम घेतले.



बोल्हेगाव येथील किडस् सेकंड होम स्कूलमध्ये आयोजित मोदक स्पर्धेप्रसंगी माजी नगरसेविका सौ. वीणा बोज्ञा. समवेत इतर महिला, सहभागी विद्यार्थी.

# बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम स्कुलमध्ये मोदक स्पर्धा

### सहजयोग ध्यान साधनेने सुप्त कलागुणांना वाव मिळतो : सौ. वीणा बोज्ञा

नगर - विश्व निर्मल फौंडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री प्रायमरी स्कुलमधे श्री गणेश उत्सवा निमित्त मोदक स्पर्धा आयोजित करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी नगरसेविका सौ. वीणाताई बोज्ञा होते. कार्यक्रमांस प्रमुख पाहुणे म्हणून व स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. सुचिता भावसार या होत्या.

या वेळी माताजी श्री निर्मलादेवी यांचे प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्याचे हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे संचालिका रुपाली रोहोकले, सौ. पारगावकर उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलतांना वीणा बोज्ञा म्हणाले गणेशोत्सव हा सण टिळकांनी समाजात एकीकरण निर्माण होण्यासाठी व सामूहिकता निर्माण होऊन एकमेकांमधील संबंध चांगले व्हावे या साठी सुरु करण्यात आले. सहजयोग ध्यान साधना केल्यामुळेही आपणास मनः शांती मिळून आपसातील संबंध दृढ होतात. ही ध्यान साधना केल्यामुळे सुप्त कलागुणांना वाव मिळतो. या वेळी शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या मोदक बनविण्याचे स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या पालकांनी तसेच परिसरातील महिलांनी या स्पर्धेत मोठया प्रमाणात सहभागी झाले होते. या मोदक स्पर्धेत प्रथम क्रमांक मनीषा लोखंडे, द्वितीय अंजना डेंगळे व तृतीय क्रमांक आराध्या पवार यांना देण्यात आला, विजेत्यांना स्मृती चिन्ह देऊन सन्मान करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापिका उषा गरड यांनी सूत्रसंचालन केले, उपमुख्याध्यापिका संगीता गांगर्डे यांनी पाहुण्याचे स्वागत केलं तर पर्यवेक्षक सौ. दिपाली हजारे यांनी आभार मानले. या वेळी शाळेच्या शिक्षिका सौ. रुपाली जोशी, सौ. पूजा चव्हाण, सौ. आरती हिवारकर, सौ. अर्चना चव्हाण, वैष्णवी नजन, निकिता पाळंदे, सीमा हिवाळे व पालक वर्ग उपस्थित होते.

# श्री विशाल गणेश मंदिरात महिलांचे सामुहिक अथर्वशिर्ष पठण

नगर - शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त सामुहिक अथर्वशिर्ष पठण व महाआरती करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर विणा दिघे, अमृता बेडेकर, निनाद ढोरे, ज्योती विधाते, प्रज्ञा मुनोत, सई भुजबळ, शरयु लोंढे, स्नेहल धर्माधिकारी, रोहिणी थोरात आदिंनी अथर्वशिर्ष पठणास प्रारंभ केला. यावेळी रेखा झंवर व त्यांच्या सहकारी महिलांनी शंखनाद केला. तर स्वाती कुलकर्णी व सहकारी महिलांनी शिवतांडव स्तोत्र व रामतांडव स्तोत्र पठण केले



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त सामुहिक अथर्वशिर्ष पठण, शंखनाद व महाआरती करण्यात आली. यावेळी महिला उपस्थित होत्या.

या अथर्वशिर्षमध्ये असंख्य महिला सहभागी झाल्या होत्या. पारंपारिक वेशभुषा, एक ताल-सुरात अथर्वशिर्षने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी देवस्थान ट्रस्टच्यावतीने प्रातिनिधीक स्वरुपात महिलांचा सन्मान केला, त्यानंतर महाआरती करुन प्रसाद वाटपाने सांगता झाली.

या अथर्वशीर्षसाठी नितीन पुंड, आण्णा चौधरी, गणेश आंबेकर, राजू जग्गी, राजेश एकाडे, गणेश पालवे, वैभव जगताप, सुधीर सुळ, प्रणित अनमल, सुहास दुर्गे, विनायक कानडे, बाळासाहेब व्यापारी, किशोर सुडके, मिलिंद कानडे, संदिप फुलसौंदर, संदिप बेरड, प्रदिप झोडगे आदिंनी सहकार्य केले.

याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे, रंगनाथ फुलसौंदर, चंद्रकांत फुलारी, गजानन ससाणे, माणिकराव विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह पुजारी संगमनाथ महाराज उपस्थित होते.

सुत्रसंचालन विणा दिघे यांनी केले. तर आभार ॲड.अभय आगरकर यांनी मानले. या कार्यक्रमास तबल्याची साथसांगत विकास साबळे यांनी दिली. तर साऊंड सिस्टीमची व्यवस्था रोहन ढोरे यांनी केली, तर मुकुंद शास्त्री मुळे यांनी प्रार्थना करून सांगता केली.

# अर्थजगत

हॅलो, मी अमूक बँकेतून बोलतोय किंवा बोलतेय. तुम्ही अजून आमची नोटीस स्वीकारली नाही. नोटीशीचे कारण जाणून घ्यायचे असेल तर हे बटण दाबा...' असे कॉल अनेकांना आले असतील आणि काही जण या कॉलच्या जाळ्यात अडकलेही असतील. अशा प्रकारच्या फसव्या कॉलमुळे अनेकांना लाखोंचा गंडा बसला आहे. त्यामुळे अशा मंडळीबाबत आरबीआयकडे तक्रारींचा पाऊस पडत आहे. अखेर ३० ऑगस्ट २०२४ रोजी यासंदर्भात आरबीआयने अधिसूचना जारी केली आहे. फसवणूक कशा प्रकाराने होऊ शकते आणि त्यांची पद्धत कशी आहे, याबाबतची थोडक्यात माहिती आरबीआयने सार्वजनिक केली आहे. आरबीआयच्या नावावर येणारे फसवे मेल्स, कॉल्स आणि मेसेजपासून सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. संपूर्ण चौकशीअंतीच त्याला उत्तर द्यावे, असेही आरबीआयने म्हटले आहे.

## फसवणुकीबाबत आरबीआयचा इशारा




**फसवे मेल्स, मेसेज** आरबीआयने म्हटले, आमच्या नावावर अनेक प्रकारचे बनावट मेसेज आणि ईमेल लोकांना पाठविले जात आहेत. यात आरबीआयच्या बनावट लेटरहेड, इमेल अ‍ॅड्रेसचा वापर होत आहे. या माध्यमातून लोकांना लॉटरी जिंकल्याचे, फंड ट्रान्सफर, परदेशात पैसे पाठविणे आणि सरकारी योजनांच्या नावावर फसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिवाय आरबीआयचे कर्मचारी असल्याचे सांगत लोकांना कॉल केल्याचेही प्रकार घडले आहेत. याप्रमाणे ठगसेन हे लोकांना प्रक्रिया शुल्क, ट्रान्सफर फीस आदींच्या नावावर पैसे मागितात. अशा लोकांपासून सावधान राहणे गरजेचे आहे.

**बँक खाते आणि वैयक्तिक माहितीची मागणी**

लघु आणि मध्यम उद्योजकांना सरकार किंवा आरबीआयचे अधिकारी म्हणून टार्गेट केले जात आहे. त्यांना सरकारी करार आणि योजनेच्या नावाखाली अनामत रक्कम मागितली जात आहे. आकर्षक फायदे देखील सांगितले जात आहेत. शिवाय कॉल, एसएमएस, ईमेलच्या माध्यमातून लोकांशी संपर्क करत खाते बंद किंवा गोठविण्याची धमकी दिली जाते. ते बँक खात्याचे विवरण, पिन, ओटीपीसारखी संवेदनशील माहिती देण्यास भाग पाडतात. एवढेच नाही तर प्रसंगी लोकांना बनावट लिंक पाठवून अ‍ॅप देखील इन्स्टॉल करून घेतात.

● ब्लॅकमेल करत डिजिटल अरेस्ट अनेकदा तर सायबर गुन्हेगार पीडितांना संशयित व्यवहार, आर्थिक गैरव्यवहार आणि फसवणुकीच्या नावाखाली ब्लॅकमेल करत म्हणजे तुमचे नाव या गैरव्यवहार असल्याचे सांगत 'डिजिटल अरेस्ट' केल्याचे प्रकार घडले आहेत. याशिवाय बेकायदा मार्गाने कर्ज देणारे बनावट संकेतस्थळ आणि अ‍ॅप सक्रिय असून ते बंद करण्यासाठी आरबीआयकडून वेळोवेळी पावले उचलली गेली आहेत. याबाबत नागरिकांना सजग करण्यात आले आहे.

■ जाणून घ्या

**कसे सुरक्षित राहाल?**

● आरबीआयने ग्राहकांना सुरक्षितेबाबत काही टिप्स दिल्या आहेत. यानुसार तुम्ही, आम्ही सुरक्षितपणे व्यवहार करू शकतो. हॅकर्स आपल्या खात्याच्या व्यवहारावर लक्ष ठेऊन असतात. म्हणून फसव्या कॉलपासून सावध राहणे महत्त्वाचे ठरते. आरबीआय देशात निधीचे वाटप करण्यासाठी व्यक्ती, कंपनी आणि ट्रस्टच्या नावावर कधीही खाते उघडत नाही. शिवाय कधीही खाते सुरू करण्यास सांगितले जात नाही आणि पैसे जमा करण्याचेही आवाहन करत नाही.

● लॉटरी, फंड याबाबतचे मेल कधीही आरबीआय पाठवत नाही. तसेच लॉटरी जिंकल्याचे किंवा परदेशातील फंडच्या बनावट प्रस्तावाशी संबंधित कोणताही मेसेज आणि पत्र, मेल पाठवत नाही.

● सायबर गुन्हेगार अधिकाऱ्यांच्या नावाखाली बनावट कॉल करत राहतात. मेल आणि मेसेजही पाठवतात. काही वेळा ग्राहकांची दिशाभूल होते. लक्षात ठेवा, आरबीआयचे अधिकारी कधीही फोन करत नाहीत.

● खात्याचे लॉगइन विवरण, वैयक्तिक माहिती, केवायसी कागदपत्रांच्या प्रती, पीन, पासवर्ड, ओटीपी शेअर करू नये. अज्ञात व्यक्ती किंवा संस्थेशी आर्थिक व्यवहाराबाबत संवाद करू नये. बेकायदा संकेतस्थळ, अ‍ॅपपासून सावध राहावे. थकबाकीचा एखादा मेल, मेसेज येत असेल तर बँकेच्या शाखेशी संपर्क साधावा.

● आरबीआयच्या संकेतस्थळावर अधिकृत आर्थिक संस्थांचे विवरण उपलब्ध आहे. त्यामुळे अन्य फसव्या संकेतस्थळाच्या किंवा आरबीआयच्या मान्यता नसलेल्या संस्थेच्या जाळ्यात अडकू नये. फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच किंवा फसवणूक झाली असेल तर बँकेला संपर्क करणे तसेच सक्तवसुली संचालनालय (ईडी)ला घडलेल्या प्रकाराची माहिती द्यावी. अ‍ॅप किंवा संकेतस्थळाच्या भूलथापांना बळी पडू नये. शिवाय आरबीआयच्या संकेतस्थळावरही तक्रार नोंदविता येऊ शकते.

◆◆◆

**गे**ल्या आठ महिन्यांपासून अमेरिकेसह जगभरातील शेअर बाजार, त्यांचे निर्देशांक आणि गुंतवणूकदार ज्या क्षणाची वाट पहात होते तो फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरकपातीची घोषणा होण्याचा क्षण या आठवड्यात प्रत्यक्षात येणार असे मानले जात आहे. डॉलर इंडेक्समधील घसरण, अमेरिका व भारतासह जगभरातील बाजारात दिसणारी 'हिरवाई' याचे पूर्वसंकेत देत आहे. भारतीय बाजाराने गेल्या आठवड्यात गाठलेला नवा उच्चांक ही संभाव्य दरकपातीला दिलेली पूर्वसलामी होती. तथापि, ही घोषणा होईपर्यंत बाजारात घुसळण दिसू शकते. तसेच दरकपातीबाबत जर पुन्हा निराशा झाली तर विक्रमी घसरण दिसण्याची शक्यताही नाकारता येत नाही, हेही विसरता कामा नये. शक्तिकांत दास यांच्या बँकांसंदर्भातील विधानाचे पडसाद उमटतात का हेही पहावे लागेल. नवीन गुंतवणुकीसाठी वेट अँड वॉच धोरण उपयुक्त ठरेल.

## अनंत उत्सुकतेचा सप्ताह

चालू आठवड्यात १७ आणि १८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह या केंद्रीय मध्यवर्ती बँकेच्या बैठकीकडे सध्या जगभरातील शेअर बाजारांचे, निर्देशांकांचे, गुंतवणूकदारांचे, ब्रोकर्सचे लक्ष लागून राहिले आहे. विवाहाचा मुहूर्त जसजसा जवळ येतो तसतशी वधुवरांची घालमेल ज्याप्रमाणे सुरू होते तशीच स्थिती सध्या गुंतवणूकदारांची झाली आहे. याचे कारण यासंदर्भात विविध विश्लेषकांकडून मांडली जाणारी वेगवेगळी मते. बहुतांश विश्लेषकांनी फेडरल रिझर्व्हकडून पाव ते अर्ध्या टक्क्यांची दरकपात केली जाईल अशी शक्यता वर्तवली आहे. तसे झाल्यास भारतासारख्या उभरत्या अर्थव्यवस्थांसाठी ती सुवार्ता असेल. कारण यामुळे डॉलर काहीसा कमजोर होऊन विदेशातून येणारा पैशांचा ओघ वाढेल असे मानणारा एक वर्ग आहे. असेही मुख्य व्याजदरातील कपात ही शेअर बाजारासाठी चांगली बातमी असते. कारण यामुळे गुंतवणूकदारांना स्वस्तात भांडवल उपलब्ध होते आणि ते बाजारात गुंतवून नफा कमावण्याची संधी मिळते. मात्र यावेळी मुद्दा केवळ दरकपातीचा नसून ती किती होणार हा मोठा मुद्दा असून त्याचा परिणाम बाजारावर होणार आहे. जर अमेरिकन फेडने व्याजदरात मोठी कपात केली तर शेअर बाजारात नकारात्मक पडसाद उमटू शकतात. बहुतेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की फेड व्याजदरात २५ बेसिस पॉइंट्स म्हणजेच ०.२५ टक्क्यांची कपात करेल. तथापि, काहींचा असा विश्वास आहे की ती अर्धा टक्के असेल. व्याजदरातील मोठी कपात अमेरिकन अर्थव्यवस्थेची चिंताजनक स्थिती दर्शवणारी मानली जाऊ शकते. त्यावर बाजारातून नकारात्मक प्रतिक्रिया दिसू शकतात.




या सर्व शक्यतांदरम्यान भारतीय शेअर बाजाराने गेल्या आठवड्यात जोरदार मुसंडी मारत सर्व नकारात्मक, मंदीच्या शक्यतांना पायदळी तुडवत नवा उच्चांक गाठला. फेड रिझर्व्हच्या आगामी बैठकीबरोबरच देशांतर्गत दमदार मान्सून, नियंत्रणात असलेली महागाई यांचाही सकारात्मक परिणाम बाजारावर दिसून आला. गेल्या आठवड्यात बीएसई सेन्सेक्सने २.१० टक्क्यांची म्हणजेच १७०७ अंकांची उसळी घेत ८२८९०.९४ वर विसावा घेतला आहे; तर निफ्टी ५० निर्देशाकांत ५०४.३५ अंकांची वाढ होऊन तो २५३५६.५० अंकांवर बंद झाला आहे. गतसप्ताहात स्मॉलकॅप निर्देशांकात, लार्जकॅपमध्ये २-२ टक्क्यांची वाढ झाली, तर मिडकॅपमध्ये १.५ टक्क्यांची वाढ झाली. १२ सप्टेंबर रोजी निफ्टीने २५४३३.३५ आणि सेन्सेक्सने ८३११६.१९ हा नवा उच्चांक गाठला होता. निफ्टी एफएमसीजी, निफ्टी आयटी, निफ्टी मीडिया निर्देशांकात ३ टक्क्यांची वाढ दिसून आली.

या तेजीला मूळ आधार ठरला तो विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून झालेली खरेदी. एफआयआयनी गतसप्ताहात १५१९९.६ कोटींच्या समभागांची खरेदी केली आहे; तर डीआयआयनीही २४४४.१९ कोटींचे समभाग खरेदी केले आहेत. चालू महिन्यात आतापर्यंत एफआयआयनी १६६००.८८ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली आहे.

टेक्निकल चार्ट पाहिल्यास निफ्टीमध्ये चढती भाजणी कायम राहण्याचे संकेत मिळत आहेत; पण बाजार सध्या ओव्हरबॉट स्थितीत गेला आहे. त्यामुळे फेडच्या निर्णयापर्यंत आणि नंतरही बाजारात जोरदार घुसळण दिसू शकते. निफ्टीसाठी २५२२५-२५००० या भक्कम आधार पातळी आहेत; तर २५५०० च्या वर निफ्टी स्थिरावल्यास तो २५७०० ते २६ हजारांपर्यंत झेपावू शकतो. २५हजारांखाली गेल्यास ट्रेंड बदलला असे म्हणता येईल. बँकनिफ्टीसाठी ५१३५० ही भक्कम आधार पातळी असून ५२२५० ते ५२७०० पर्यंत हा निर्देशांक झेपावूही शकतो.

यादरम्यान नुवामा'च्या एका अहवालाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. त्यानुसार २००१ मध्ये, टेक बबल फुटल्यानंतर फेडच्या दर कपातीला नऊ महिने उशीर झाला होता. त्यामुळे जागतिक बाजारात डी-रेटिंग झाले आणि २००१ मध्ये निफ्टीत ३५ टक्क्यांची घसरण झाली होती. २०२० मध्ये निफ्टीत २० टक्के घसरण झाली होती. २००७-०८ च्या दर कपातीपूर्वी बाजारात चांगली तेजी राहिली; पण जागतिक संकटामुळे पुढे २००८ मध्ये बाजार ६० टक्क्यांनी घसरले होते. हे लक्षात घेऊन गुंतवणूकदारांनी आपली जोखीम कमीत कमी कशी करता येईल याकडे लक्ष द्यायला हवे. मध्यमकालीन-अल्पकालीन गुंतवणूकदारांनीही यापुढील उच्चांकावेळी नफावसुली करावी, असा सल्ला दिला जात आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे फेड रिझर्व्हच्या संभाव्य दरकपातीनंतर भारतात आरबीआयही पुढील महिन्यात रेपोदरात कपात करेल अशी चर्चा सुरू होती. पण गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी अलीकडेच एका कार्यक्रमात बोलताना दरकपातीचे धोके विषद केले आहेत. त्यामुळे आरबीआय लागलीच फेडची री ओढण्याची शक्यता दिसत नाहीये. ही बाब गुंतवणूकदारांनी लक्षात ठेवावी.

समभागांच्या पातळीवर विचार करता उच्चांकासमीपचे समभाग टाळावेत. ग्रॅन्युअल्सचा समभाग ५५० रुपयांना खरेदी करुन ६८० रुपये लक्ष्य ठेवता येईल. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ ७५५ रुपयांना खरेदी करुन ८९० रुपये लक्ष्य ठेवता येईल. स्वॅन एनर्जीचा समभाग६१५ रुपयांसमीप खरेदी करुन ६७० रुपये लक्ष्य ठेवता येईल.

एकूणात पाहता, बाजार तेजीच्या मूडमध्ये असला, एफआयआयकडून खरेदी सुरू झाली असली आणि समोर फेड रिझर्व्हची संभाव्य दरकपात दिसत असली तरी बाजारातील जोखीमही तितकीच वाढलेली आहे. सबब अशा काळात वेट अँड वॉच भूमिका घ्यावी; अन्यथा सेल ऑन राईज ही भूमिका घ्यावी.

◆◆◆

## मनाप्रमाणे निवडा क्रेडिट कार्ड पेमेंट नेटवर्क

*क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग, युपीआयसारखे पर्याय बदलत्या बँकिंग व्यवहाराचे प्रतीक आहेत. प्रामुख्याने क्रेडिट कार्डधारकांची संख्या विक्रमी पातळीवर पोचलेली असताना आरबीआयकडून ग्राहकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा केला जात असताना आता स्वत:च्या सोयीनुसार आणि परवडणारे क्रेडिट कार्ड पेमेंट नेटवर्क निवडण्याची मुभा मिळणार आहे.*




**स**ध्या काही अपवाद वगळता क्रेडिट कार्डधारकांना आपल्या सोयीनुसार पेमेंट नेटवर्क निवडण्याचा पर्याय मिळत नाही. बँकेशी करारबद्ध असलेल्या पेमेंट नेटवर्कचाच वापर करावा लागतो. पण आता क्रेडिट कार्डधारकांना सुविधेनुसार नेटवर्क निवडण्याची मूभा दिली आहे. याप्रकारची नवीन व्यवस्था ६ सप्टेंबरपासून लागू झाली आहे.रूपे, व्हिसा किंवा मास्टरकार्ड यापैकी एकाची निवड करता येणार आहे.

क्रेडिट कार्डधारकांसाठी चांगली बातमी आहे. क्रेडिट कार्ड नेटवर्कची निवड आता स्वत:ला करता येणार आहे. व्हिसा, रुपे, मास्टरकार्ड यापैकी एकाची निवड करता येणार आहे. पूर्वी क्रेडिट कार्डधारकांना पेमेंट नेटवर्क निवडण्याचा पर्याय नव्हता. आरबीआयने यासंदर्भात मार्च महिन्यांत सर्कुलर जारी केले होते. या माध्यमातून बँकांना आणि नॉन बँक क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्यांना कार्ड नेटवर्कशी एक्सक्लूसिव्ह करार करण्यास मनाई केली. प्रत्यक्षात यापूर्वीच क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या बँका आणि आर्थिक कंपन्यांनी ग्राहकांच्या पसंतीनुसार क्रेडिट कार्ड नेटवर्क निवडण्याचा पर्याय द्यायला हवा होता, पण आता आरबीआयने यात हस्तक्षेप करत नियमात बदल केला आहे.

■ नवं काही...

**पेमेंट कंपन्यांत स्पर्धा वाढेल**

दीर्घकाळापासून बँका आणि क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्यांसाठी व्हिसा आणि मास्टरकार्ड क्रेडिट कार्ड ही पहिली पसंती राहिली.सध्या रुपेचे नेटवर्क वाढल्याने स्पर्धा वाढली आहे. यस बँकेचे अधिकारी अनिल सिंह म्हणतात, आरबीआयच्या निर्णयाचा हेतू पाहिल्यास डिजिटल पेमेंटची व्याप्ती वाढविणे हा आहे. परिणामी क्रेडिट कार्ड कंपन्यांत स्पर्धा वाढेल. ग्राहकांना मिळणारे लाभ, शुल्क, ग्राहकांचा अनुभव आणि व्याप्ती या आघाडीवर क्रेडिट कार्ड कंपन्या दर्जेदार सेवा देत ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतील.

**स्वत:चे पेमेंट नेटवर्क असणाऱ्यांवर लागू नाही**

क्रेडिट कार्डसाठी स्वत:चे पेमेंट नेटवर्क वापर करणाऱ्या बँकांना या बदलाच्या बाहेर ठेवले. अमेरिकन एक्स्प्रेस हे त्याचे उदाहरण. ते यापुढेही क्रेडिट कार्डसाठी प्रोपायटरी नेटवर्कचा (मालकी प्रणाली) वापर करत राहतील. बँक ऑफ बडोदा आणि यस बँक यासारख्या बँकांनी अगोदरपासूनच क्रेडिट कार्डची निवड ग्राहकांच्या मनावर सोडली. त्यांना आवडीचे नेटवर्क निवडण्याचा पर्याय दिला. ऑनलाइन किंवा ऑफलाइन अर्ज करणाऱ्या ग्राहकांना बँकाकडून पर्याय दिला जात आहे.

**ग्राहकांना होणार फायदे**

तज्ज्ञांच्या मते, आरबीआयच्या या निर्णयामुळे ग्राहकांना चांगला लाभ होणार आहे. 'बॉबकार्ड'चे अधिकारी रविंद्र राय म्हणतात, एखाद्या विशेष नेटवर्कचे ठराविक भागात किंवा देशात अधिक लाभ राहू शकतात. त्यामुळे ग्राहकांना चांगल्या व्यवहाराचा अनुभव मिळू शकतो. 'कार्ड इनसायडर'चे अंकुर मित्तल म्हणतात, यूपीआय पेमेंट सध्या लोकप्रिय आहे. अशावेळी ग्राहकांना रुपे नेटवर्कचे क्रेडिट कार्ड हवे असते. पण नेटवर्कचा पर्याय मिळत नसल्याने त्याची निवड करू शकत नाहीत.पण आता नव्या बदलामुळे ग्राहक पसंतीचे नेटवर्क असणाऱ्या क्रेडिट कार्डची मागणी करू शकतात आणि तसे उपलब्ध करून घेऊ शकतात.

◆◆◆

## पॅसिव्ह स्कीम फंडांची



**स**ध्या म्युच्युअल फंडच्या पॅसिव्ह स्कीममध्ये गुंतवणूकदारांचा कल वाढत आहे. विशेष म्हणजे यावर्षी पॅसिव्ह स्कीमच्या ६२ नवीन फंड ऑफर लाँच करण्यात आले. गतवर्षी ५१ पॅसिव्ह फंड लाँच करण्यात आले होते. आकडेवारीचे आकलन केल्यास दीर्घकाळात पॅसिव्ह फंडचा परतावा इक्विटवटी फंडपेक्षा अधिक राहिला आहे.

यावर्षी म्युच्युअल फंडच्या पॅसिव्ह स्कीमने गुंतवणुकदारांची उत्सुकता वाढविली आहे.'इक्विटी एमएफच्या डेटा'च्या माहितीनुसार म्युच्युअल फंडचे एकूण १०६ न्यू फंड ऑफर लाँच झाले आणि त्यापैकी ६३ फंड पॅसिव्ह स्कीमचे होते. २०२३ मध्ये ५१ पॅसिव्ह फंड लाँच झाले. गेल्या काही वर्षांत वाढत्या परताव्याने पॅसिव्ह फंडकडे गुंतवणूकदारांचा कल वाढला आहे.

**पॅसिव्ह फंडचा अर्थ काय?**

पॅसिव्ह फंड म्हणजे बेंचमार्क इंडेक्सनुसार गुंतवणूक करणे. म्हणून या फंडला मॅनेज करण्यासाठी फंड मॅनजरची गरज भासत नाही. उदा. एखाद्या पॅसिव्ह फंड्या बेंचमार्क इंडेक्स निफ्टी ५० असेल तर तो फंड केवळ निफ्टी ५० मध्ये सहभागी असलेल्या कंपन्यांतील शेअरमध्ये गुंतवणूक करेल. तुमची गुंतवणूक निफ्टीच्या ५० मधील प्रत्येंक कंपनीच्या प्रभावानुसार विभागली जाते. या फंडचे व्यवस्थापन करण्यासाठी मॅनेजर नसतो आणि त्यामुळे त्याचा एक्स्पेन्स रेशो कमी राहतो.

**बेंचमार्कपेक्षा अधिक परताव्याचा दबाव नाही**

सेक्टम वेल्थचे प्रमुख अलख यादव म्हणतात, पॅसिव्ह फंडची अधिक ग्रोथ होण्याचे कारण म्हणजे एखाद्या सक्रिय फंडप्रमाणे बेंचमार्कपेक्षा अधिक परतावा देण्याचा दबाव पॅसिव्ह फंडवर नसतो. प्रामुख्याने लार्जकॅप फंडच्या बाबतीत असा अनुभव येतो. दुसरे म्हणजे पॅसिव्ह फंडला समजून घेणे सोपे आहे आणि त्याचे कॉस्ट स्ट्रक्चर पाहिले तर त्याचा खर्चही कमी राहतो. म्हणून रिटेल आणि जुने असे दोन्ही प्रकारच्या गुंतवणूकदारांना हा चांगला पर्याय राहतो.

**दीर्घकाळासाठी इक्विटी फंडापेक्षा चांगली कामगिरी**

क्रेडिट डॉट पीईचे संस्थापक प्रशांत कुमार म्हणतात, पॅसिव्ह फंडची कामगिरी साधारणपणे अर्थव्यवस्थेच्या स्थितीवर अवलंबून असते. भारतासारख्या अर्थव्यवस्थेत पॅसिव्ह फंडची कामगिरी ॲक्टिव्हली मॅनेज्ड फंडच्या तुलनेत चांगली राहिलेली आहे. कारण एक्स्पोजर अधिक असते आणि चढउतार देखील कमी राहते. दहा वर्षाच्या काळात पॅसिव्ह फंडने ९० टक्के मॅनेज्ड फंडच्या तुलनेत चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे हा फंड दीर्घकाळाच्या गुंतवणुकीसाठी सुरक्षित आहे.

■ म्युच्युअल फंड

**वैविध्यपणाच्या आघाडीवर दमदार**

पॅसिव्ह फंडचा फायदा म्हणजे पोर्टफोलिओच्या डायव्हर्सिफिकेशनच्या दृष्टीने हा फंड चांगला मानला जातो. प्रामुख्याने रिटेल गुंतवणुकदारांसाठी हा फंड फायद्याचा आहे. कारण गुंतवणूक केल्यानंतर कोणत्याही प्रकारचा दबाव फंडवर येत नाही. जर्मिनेट इन्वेस्टर सर्व्हिसेसचे संतोष जोसेफ म्हणतात, ज्यांना सक्रिय मॅनेजमेंट नको असेल, अशा गुंतवणूकदारांसाठी पॅसिव्ह फंड उपयुक्त आहे.

◆◆◆

*बँकेच्या ब्रिज लोनची माहिती फार कमी लोकांना ठाऊक असेल. तुम्हाला एखादी महागडी मालमत्ता, मोटार, घर तातडीने खरेदी करायचे असेल आणि पैशाची पुरेशी व्यवस्था होत नसेल तर हे कर्ज फायदेशीर राहू शकते. या कर्जाला आपत्कालिन कर्जही म्हणू शकतो. तुमची तात्पुरती आर्थिक गरज भागविण्याचे काम हे कर्ज करते. वैयक्तिक कर्जाप्रमाणे ब्रिज लोन समजले जात असल्याने त्याचे व्याजदर सामान्य गृहकर्जापेक्षा अधिक असतो.*

## 'ब्रिज लोन'च्या अंतरंगात...




**उ**दाहरणार्थ, रामनाथ प्रफुल्ल यांचे आलिशान घर होते. त्यांच्या घराची किंमत सुमारे एक कोटीच्या आसपास होती. मात्र एक दिवस त्यांच्या पाहण्यात एक टुमदार घर आले. ते सध्याच्या घरापेक्षा आकर्षक होते. तेथे स्विमिंग पूलासह आणखी काही सुविधा होत्या. अशावेळी प्रफुल्ल यांनी जुने घर विकून नवीन घर घेण्याचा विचार केला. यासंदर्भात त्याने नव्या घराच्या मालकाशी चर्चा केली. एक महिन्यात घर खरेदी केले तर फायद्याचे राहिल असे त्या मालकाने सांगितले. कारण अन्य ग्राहकही हेच घर खरेदीसाठी इच्छुक असल्याचे सांगितले. अशावेळी प्रफुल्ल यांनी तातडीने जुने घर विकून नवे घर एका महिन्यात खरेदी करण्याची हमी घरमालकाला दिली. मात्र वीस दिवस झाले तरी जुने घर विकले गेले नाही. अशावेळी रक्कमेचा बंदोबस्त होऊ शकला नाही. दहा दिवसच शिल्लक राहिले होते. तेव्हा त्यांनी नव्या घराच्या मालकाला समस्या सांगितली असता त्याने धीर दिला आणि बँकेकडून शॉट टर्म ब्रिज लोन खरेदी करत माझे घर विकत घ्या आणि जेव्हा आपले घर विकले जाईल तेव्हा ब्रिज लोनची रक्कम भरून टाका, असा सल्ला दिला. प्रफुल्ल यांना हा सल्ला पटला आणि त्यांनी बँकेडून ब्रिज लोन घेत नवीन घर खरेदी केले. त्यानंतर तीन महिन्यात घर विकले गेले तेव्हा त्यांनी ब्रिज लोनची रक्कम भरून टाकली. म्हणजेच तातडीची आर्थिक गरज भागविण्यासाठी ब्रिज लोन उपयुक्त ठरते. या कर्जाची माहिती जाणून घेऊ.

■ बँकिंग विश्व

**● ब्रिज लोन म्हणजे काय?**

बहुतांश सरकारी आणि खासगी बँकांनी कमी कालावधीची ब्रिज लोनची सुविधा पैशाची निकड दूर करण्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे. उदा. तुम्हाला मालमत्ता खरेदी करायची असेल परंतु आपल्याकडील पैसे महिन्यानंतर मिळणार असतील तर त्यासाठी ब्रिज लोन मोलाची मदत करते. शिवाय महागडी मोटार, रंगकाम किंवा अन्य कोणतिही वस्तू खरेदी करायची असेल म्हणजे तुम्हाला वाटेल तेव्हा घरेदी करायचे असेल आणि पैशाची पुरेशी व्यवस्था होत नसेल तर अशावेळी बँकेकडून ब्रिज लोन घेत आर्थिक गरज पूर्ण करू शकतो. ब्रिज लोन हे कमी कालावधीचे कर्ज समजले जाते. एखाद्याकडे पैसे आहेत, परंतु वेळेला ते मिळत नसतील तर अशावेळी ही मंडळी ब्रिज लोन घेऊन काम पूर्ण करतात आणि पैसे हातात पडल्यानंतर कर्जाची फेड करू टाकतात. एकार्थाने ब्रिज लोन हे आपत्कालिन कर्ज म्हणून ओळखले जाते आणि त्याचा उपयोग आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी केला जातो. ज्यांना दीर्घकाळासाठी कर्ज नको असेल, अशा मंडळींना ब्रिज लोन फायद्याचे राहते.

**● किती व्याजदर?**

ब्रिज लोनचा व्याजदर कालावधीवर अवलंबून असतो. कमी कालावधीचे टर्म लोन असल्याने त्याचा व्याजदर अधिक असतो. साधारणपणे दहा ते अठरा टक्के वार्षिक व्याजदर आकारला जातो. हे कर्ज पर्सनल लोनच्या श्रेणीत येते आणि त्यामुळे यात कमाल व्याजदर १८ टक्क्यांपर्यंत आकारला जावू शकतो. मात्र एखादा व्यक्ती काही आठवड्यात किंवा महिन्यातच त्याची परतफेड करत असेल तर त्याचे व्याजदर कमी राहू शकतो किंवा वेगळा राहू शकतो. या कर्जाचे वैशिष्ट्ये म्हणजे एखाद्याने तीन आठवड्यासाठी कर्ज घेतले असेल तर त्याचा कालावधी एक वर्षापर्यंत वाढवू शकतो.

**● अर्ज कसा करावा?**

ब्रिज लोनसाठी तुम्हाला बँकेत जावून व्यवस्थापकाशी चर्चा करावी लागेल. तुमच्या अडचणी व्यवस्थापकाला सांगितल्यानंतर तो तुम्हाला किती कर्ज किती कालावधीसाठी घेणे उपयुक्त राहिल, याबाबत मार्गदर्शन करेल. त्यानंतर कर्ज विभागाच्या व्यवस्थापकाला अर्ज देत तुमचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवासी पुरावा, ओळखपत्र, पॅन, आधार, विद्यमान मालमत्तेची माहिती, आयटीआर आदी महत्त्वाची कागदपत्रे दाखवावी लागतील आणि जमा करावे लागतील. यावेळी बँकेकडून प्रक्रिया शुल्क देखील आकारले जाते. प्रक्रिया शुल्क कर्जाच्या रक्कमेच्या कमाल दोन टक्के राहू शकते.

**● किती कालावधीसाठी कर्ज?**

ब्रिज लोन तीन आठवड्यांपासून ते एक वर्षांपर्यतच्या कालावधीसाठी दिले जाते. एखाद्या व्यक्तीकडे स्वत:चे पैसे आहेत, परंतु ते अडकलले आहेत आणि ते काही काळानंतर मिळणार असतील तर अशावेळी ब्रिज लोन घेऊन ही मंडळी आपले काम पूर्ण करतात. तसेच अडकलेले पैसे मिळताच ब्रिज लोनमध्ये भरून टाकतात.

◆◆◆

## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आज सहाव्या गाथेचे संपुट झाले. ह्या गाथेत आपण पाहणार आहोत, आचाय मानतुंग महाराज ऋषभदेव (आदीनाथ) यांचे गुणगान करत असताना, हे प्रभो मी (मानतुंगजी) तर अल्पज्ञानी आहे. परंतु आपण सर्वज्ञ आहात. मी (मानतुंगजी) मोहबंधनात बंदिस्त आहे तर तुम्ही निर्मोही अष्टकर्म पासून मुक्त आहात. हे प्रभु आपण ज्ञानाचे महासागर आहात तर मी त्याच समुद्राचा एक थेंब आहेत, तुम्ही ज्ञानाचे सूर्य आहात तर मी एक तारा आहे.

जसे :- एका गरीब व्यक्तीच्या झोपडीत त्या राज्याचे अतिप्रसन्नत्वाचा रोमांचकारी अनुभव होतो, तर मला (मानतुंगजी) तसा अनुभव होत आहे. हे जिनेश्वर परमेश्वरा तू एक मात्र श्रद्धेचे केंद्र आहे. वीतराग भक्तीच्या नदीत मला लक्ष द्यावे लागेल, हे माझे ठाम निर्णय आहे.

सहाव्या श्लोकमध्ये आचार्यश्रीजींनी कोकिळच्या मधुर आवाजाचे वर्णन केले आहे. जसे वसंत ऋतुमध्ं नवीन पालवी झाडांना फुटते, आंब्याच्या झाडाला मोहर येतो. हा आंब्याचा मोहोर कावळा, कोकिळा व इतर सर्व पशुपक्षी खात असतात, हे मोहोर खाल्याने कोकिळेच्या आवाजात बदल जाणवतो. तसे इतर पशुपक्षीमध्ये बदल पाहायला मिळत नाही. कोकिळेचा मधुर स्वर कवी, विद्वान, ऋषी व पंडितांना आकर्षित करतात. त्याचप्रमाणे आचार्यश्री सांगतात माझ्या अल्पज्ञानाने परमेश्वराची केलेली स्तुती ही सर्वांना प्रफुल्लित करेल.

**गाथा** :- (सरस्वती प्रसारक)

*अल्पश्रुत श्रुतवंता परिहास धाम -*
*त्वद्भक्तिरेव मुखरी कुरुते बलान्माम् ।*
*यत्कोकिलः किल मधो मधुरं विरोति -*
*तच्चाम्र चारू कलिकानिकरैकहेतुः ॥६॥*

**अर्थ** :- वसंत ऋतुत ज्याप्रमाणे आंब्याच्या झाडाला मोहोर लागला की कोकिळा आपल्यावर नियत्रण ठेवू शकत नाही व मधुर गीत गात राहते, त्याचप्रमाणे मी (मानतुंगश्रीजी) एक सामान्य मामूस आहे, विद्वान व जाणकार लोकांमध्ये चेष्टेचा विषय आहे, तुझ्या भक्तिमुळेच मी आपली भक्ति करण्यास तत्पर आहे.

**- सौ. सविता चोरडिया**

# गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी शहरासह जिल्ह्यात पोलिस बंदोबस्त

### नगर शहरातील मिरवणुकीवर राहणार ड्रोन कॅमेरे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

नगर - नगर शहरासह जिल्ह्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. जिल्ह्यात सुमारे ३ हजार लहान-मोठ्या सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांनी श्री गणेशाची स्थापना केली असून मंगळवारी (दि.१७) अनंत चतुर्दशीच्या दिवशी बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली ड्रोन कॅमेरे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह सुमारे साडेतीन हजार पोलीस व होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

नगर शहरात पहिला मानाचा गणपती असलेल्या ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरात जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्या हस्ते श्री गणेशाची उत्थापन पूजा होऊन सकाळी १० वाजता मिरवणुकीला सुरूवात होणार आहे. माळीवाडा विशाल गणपती नंतर मानाची गणेश मंडळे मुख्य मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. मिरवणूक मार्गावर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. तसेच स्थानिक दुकाने व इतर आस्थापनांच्या कॅमेऱ्यांची ही मदत मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी घेतली जाणार आहे. मिरवणूक मार्ग व त्या लगतच्या परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन तैनात करण्यात येणार आहेत. केडगाव उपनगर, सावेडी उपनगर परिसरातही अनेक मंडळे स्वतंत्र मिरवणुका काढणार आहेत.

जिल्ह्यात यंदा गणेशोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जात आहे. जिल्ह्यात २६३६ लहान-मोठ्या सार्वजनिक व ११३ खासगी गणेश मंडळांसह २६१ गावांत 'एक गाव एक गणपती' संकल्पनेतून श्री गणेशाची स्थापना केली आहे. नगर शहरासह जिल्ह्यातील संगमनेर, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, कोपरगाव या प्रमुख शहरासह ग्रामीण भागातील छोट्या- मोठ्या मंडळातील श्री गणेशाचे मंगळवारी विसर्जन केले जाणार आहे. संबंधित पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### नगरमध्ये १७ मंडळे मिरवणुकीत सहभागी होणार

यंदा मनाच्या १२ गणेश मंडळांसह १७ मंडळे मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. माजी महापौर संदीप कोतकर यांच्या नेतृत्वाखालील स्पंदन प्रतिष्ठान अनेक वर्षांनंतर मिरवणुकीत सहभागी होणार आहे. यंदाच्या मिरवणुकीत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोरदार शक्तिप्रदर्शन होण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरातही मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. मिरवणुकीत डीजेसह विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. यात लेझर लाईटचा वापर होण्याची शक्यता असल्याने कोतवाली पोलिसांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ (१) अन्वये लेझर लाइट्स वापरल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा मंडळांना दिला आहे. दरम्यान, विसर्जन मिरवणूक मार्गावर बॅरिकेटिंग करून विसर्जन मार्गाला जोडणारे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहेत.

### नगर शहरात असा आहे पोलिस बंदोबस्त

नगर शहरात मुख्य विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता मिरवणुकीला सुरूवात होणार आहे. मिरवणूक मार्गावर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नगर शहर पोलीस अधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये ३ पोलिस उपअधीक्षक, ९ पोलीस निरीक्षक, ३१ सहायक व उपनिरीक्षक, ५३० पोलीस अंमलदार, २५५ होमगार्ड, 'एसआरपीएफ'ची एक तुकडी व 'आरसीपी'ची एक तुकडी तैनात केली आहे.

### जिल्ह्यासाठी असा आहे पोलिस बंदोबस्त

जिल्ह्यात पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली २ अप्पर पोलीस अधीक्षक, ७ पोलीस उपअधीक्षक, ३७ पोलीस निरीक्षक, ६३ सहाय्यक व उपनिरीक्षक, १५३५ पोलीस कर्मचारी, ९४७ होमगार्ड, 'आरसीपी'च्या ३ तुकड्या, 'क्यूआरटी'च्या २ तुकड्या, 'एसआरपीएफ'ची १ कंपनी, 'आरएएफ'ची १ कंपनी, १० स्ट्रॅकिंग फोर्स, साध्या वेशातील पोलीस पथके, छेडछाड विरोधी पथक, ध्वनीप्रदूषण पातळी मोजण्यासाठी स्वतंत्र पथक असणार आहे.

### शहरातील ३९७ जणांवर हद्दपारीची कारवाई

विसर्जन मिरवणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासनाने नगर शहरातील ३९७ जणांवर हद्दपारीची प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १०७, तोफखाना १७० व भिंगार हद्दीतील १२० जणांना मिरवणूक काळात शहरात येण्यास प्रतिबंध करण्यात आल्याचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांनी सांगितले.

# भिंगारमध्ये गणरायाला प्रथेप्रमाणे उत्साहात निरोप



भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशांच्या गजराज गुलालाची उधळण करत सहभागी झालेले गणेशभक्त. (छाया - बबलू शेख)

नगर - भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणूक रविवारी (दि.१५) उत्साहात पार पडली. भिंगारवासियांनी प्रथेप्रमाणे आठव्या दिवशी लाडक्या गणरायाला भक्तीभावाने निरोप दिला. पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या हस्ते मानाच्या देशमुख गणपतीची उत्थापन पूजा होऊन मिरवणुकीला प्रारंभ झाला. मिरवणुकीत सतरा गणेश मंडळे सहभागी झाली होती.

रविवारी दुपारी ब्राम्हणगल्लीतील देशमुख गणपती मंदिरातील मानाच्या गणपतीची उत्थापन पूजा अधीक्षक ओला यांच्या हस्ते झाली. पूजेचे पौरोहित्य प्रसाद कुलकर्णी यांनी केले. यावेळी समीर देशमुख, कार्तिक देशमुख, आशु देशमुख, प्रज्वल देशमुख, महेश कुलकर्णी, अक्षय देशपांडे, प्रणव देशपांडे, स्वप्निल मुळे, हर्षद मुळे, शिवाजी राऊत, अनिल भोसले, राजेश तनपुरे, रमेश तनपुरे, मोरेश्वर मुळे, अनिल मुळे, संजय सपकाळ, अवधूत देशपांडे आदी उपस्थित होते. त्यानंतर श्री गणेशाची मिरवणूक पारंपरिक पध्दतीने फुलांनी सजविलेली पालखीमध्ये काढण्यात आली. या पालखीला अधीक्षक ओला यांनी खांदा देत मिरवणुकीस प्रारंभ केला. सायंकाळी विविध गणेश मंडळांकडून मिरवणुका काढण्यात आल्या. या परिसरातील एकूण १७ सार्वजनिक गणेश मंडळांचा मिरवणुकीत सहभाग होता. या मिरवणुकीसाठी मोठा बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. सात मंडळांनी डीजे लावले होते. तर, इतरांनी पारंपरिक वाद्यांच्या, ढोल ताशांच्या गजरात बाप्पाला निरोप दिला.

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार नगर विभागाचे प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) प्रमाणे अहमदनगर शहराच्या भौगोलिक हद्दीमध्ये रविवारी (दि. १५) पहाटे १२.०१ वाजेपासून मंगळवारी (दि.१७) मध्यरात्री १२ वाजेपर्यंत भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील एकूण १२० गुन्हेगारांना प्रवेशबंदी केल्याचे आदेश काढले होते.

या आदेशाचा भंग करत सकाळी ११.३० च्या सुमारास भिंगार शहरात अंतिम चौक येथे फिरणारा चेतन भागुजी शहापुरकर (रा. पाटील गल्ली, भिंगार) याला भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने पकडून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

स.पो.नि. जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस उपनिरिक्षक रेवन्नाथ दहिफळे, पो. हे. कॉ. अजय गव्हाणे, दिपक शिंदे, संदिप घोडके, अमोल आव्हाड, समीर शेख, यांनी ही कारवाई केली.



### ऐतिहासिक दगडी बारवेची स्वच्छता करा

छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील तवलेनगर कॉर्नर ते तपोवन रोड कॉर्नर दरम्यान असलेल्या ऐतिहासिक, पुरातन बारवेची अतिशय दुरावस्था झालेली आहे. त्यामध्ये कचरा, निर्माल्याचे विसर्जन केले जात असल्याने बारवेची अवस्था अतिशय खराब प्रदूषित झालेली आहे. काही भग्न मुर्त्या ही येथे आणून टाकल्या जात आहेत. बारवेमध्ये अतिशय दुर्गंधी सुटली आहे. या बारवेच्या बाजूला महामार्गावर चिकन, मटण वेस्टचा कचरा टाकल्यामुळे येथून जाताना नागरिकांना नाक दाबून जावे लागते. या बारवेत असलेल्या घाणीमुळे यात गणपती विसर्जन केले जात नाही. तरी संबधित यंत्रनेने या बारवेची स्वच्छता करण्याबरोबर यामध्ये साचलेली घाण काढून ती कायमस्वरूपी स्वच्छ कशी राहील याची व्यवस्था करावी अशी मागणी येथील नागरिक करत आहेत. (छाया - महावीर पोखरणा)

# युकेतील विद्यापीठाची नगरच्या डॉ. सेजल चंगेडे यांना पीएचडी



नगर - येथील डॉ. सेजल चंगेडे यांनी युके येथील लॅन्कास्टर विद्यापीठातून सस्टेनेबल डिझाईन विषयात पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. सस्टेनेबल डिझाईन हा एक डिझाइन दृष्टीकोन आहे, जो नकारात्मक पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न करतो. सेजल यांनी या विषयाचा सखोल अभ्यास आणि संशोधन करून पीएचडी मिळवण्याची कामगिरी केली आहे. डॉ. सेजल या दाळ मंडई येथील राजेश चंगेडे (गोळीवाला) यांची कन्या आहे.



### कोतवाली पोलिसांकडून गणरायाला उत्साहात निरोप

नगर शहरात मंगळवारी (दि.१७) गणेश विसर्जन मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीसाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. कोतवाली पोलिस ठाण्यातील सर्व अधिकारी - कर्मचारी सकाळपासूनच बंदोबस्तासाठी तैनात राहणार असल्याने पोलिस ठाण्यात बसविण्यात आलेल्या गणरायाला कोतवाली पोलिसांनी सोमवारीच (दि.१६) वाजत गाजत मोठ्या उत्साहात निरोप दिला.

# मोहंमद पैगंबर यांचे पवित्र केस दर्शनासाठी खुले, २० सप्टेंबरला शहरातून झेंडा मिरवणूक निघणार

नगर - मोहंमद पैगंबर यांच्या जयंती ईद मिलादुन्नबी (झेंडा ईद) ही १६ सप्टेंबर रोजी होती मात्र गणेशोत्सवानिमित्त मिरवणूक न काढता २० सप्टेंबर रोजी सर्वत्र उत्साहात साजरी होणार आहे. व सोमवारी ईद घरोघरी साजरी करण्यात येणार आहे. या निमित्त सालाबाद प्रमाणे शहरातील टकटी दरवाजा (मीर मुर्तूजा टकटी दरवाजा महल) येथे मोहंमद पैगंबर यांचे पवित्र केस (हजरत बाल) भाविकांच्या दर्शनासाठी दुपारपर्यंत खुले केले आहेत व शुक्रवारी संपूर्ण दिवसभर चालू राहणार आहे.

तसेच यावेळी विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या पवित्र केसाच्या दर्शनासाठी भाविक येत आहे. शुक्रवारी दर्शनासाठी भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन येथील पुजारी सय्यद बुऱ्हाण कादरी चिश्ती यांनी केले आहे. नगरला परंपरेनुसार दरवर्षी फक्त हजरत मोहंमद पैगंबर यांच्या जयंतीदिनीच पवित्र केस दर्शनासाठी खुले करण्यात येते व शुक्रवारी देखील केस दर्शनासाठी खुले राहणार आहे व नगर शहरातून झेंड्याची मिरवणुक काढण्यात येवून, ठिकठिकाणी प्रसादाचे वाटप केले जाते.



नगर शहरातील टकटी (तख्ती) दरवाजा येथे मोहंमद पैगंबरांचे पवित्र केस दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले आहेत.

# हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे भिंगारला अभियंता दिवस साजरा; कॅन्टोन्मेंटसह इतर अभियंत्यांचा सन्मान

नगर - भिंगार येथे हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने अभियंता दिवस साजरा करण्यात आला. भगवान गौतम बुध्द जॉगिंग पार्कमध्ये झालेल्या कार्यक्रमात कॅन्टोन्मेंटसह इतर अभियंत्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात अभियंते गणेश भोसले, नागेश खुरपे, सुनील हळगावकर, रमेश कोठारी, सचिन कस्तुरे, निखिल शिंदे, राहुल कपाळे, छावणी परिषदेचे कार्यकारी अभियंता महेंद्र सोनवणे, अशोक फुलसौंदर, जलसंपदा विभागचे निवृत्त अधीक्षक अभियंता शिवाजीराव बोलभट यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सुमेश केदारे, मेजर दिलीप ठोकळ, सचिन चोपडा, संजय भिंगारदिवे, दिलीप गुगळे, जहीर सय्यद, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज आनावडे, अशोकराव पराते, सर्वेश सपकाळ, अविनाश जाधव, विठ्ठल राहिंज, अभिजीत सपकाळ, संतोष हजारे, सुधीर कपाले, अविनाश पोतदार, जालिंदर अळकुटे, संतोष लुनिया, कुमार धतुरे, राजू कांबळे, सखाराम अळकुटे, सूर्यकांत कटोरे, शेषराव पालवे, किरण फुलारी, रमेश धाडगे, राजू शेख, एकनाथ जगताप, नामदेव जावळे, विकास निमसे, सुनील कसबे, योगेश चौधरी, संजय भावसार, संदीप शिंगवी, रामभाऊ झिंजे, विनोद खोत, दशरथ मुंडे, संजय बकरे, गोरख उबाळे, सुनील बग्गन आदी उपस्थित होते.




भिंगार येथे हरदिन मॉर्निंग ग्रुपच्यावतीने जागतिक अभियंतादिन कॅन्टोन्मेंटसह इतर अभियंत्यांचा सन्मान करताना अध्यक्ष संजय सपकाळ, इतर अधिकारी, पदाधिकारी, अभियंते.

संजय सपकाळ म्हणाले की, आधुनिक भारताचे शिल्पकार असलेले भाररत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवस भारतात अभियंता दिवस म्हणून साजरा केला जातो. डॉ. विश्वेश्वरय्या यांनी आधुनिक भारताच्या विकासात्मक दूरदृष्टीने पायाभरणी केली. त्यांनी उभारलेले अनेक प्रकल्प प्रेरणादायी आहे. देशाच्या विकासात्मक वाटचालीत डॉ. विश्वेश्वरय्या यांच्या प्रेरणेने काम करणारे अभियंते देशाच्या विकासात्मक वाटचालीत योगदान देत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

उपस्थित अभियंत्यांनी समाजाकडून होत असलेला सन्मान भविष्यात आनखी चांगले काम करण्यास स्फुर्ती देणारा आहे. डॉ. विश्वेश्वरय्या यांनी भारताला विकासाचा एक नवीन मार्ग दाखवला असून, आजही सर्व अभियंते त्या मार्गावर चालत असल्याची भावना व्यक्त केली. आभार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज आनवडे यांनी मानले.

## केडगावमध्ये भगवान शंकराच्या ४१ फुटी मूर्तीचा देखावा



नगर - केडगाव येथील लिंक रोड, भूषणनगर येथे गणेशोत्सवानिमित्त राजमुद्रा प्रतिष्ठानच्या वतीने ४१ फुटी भगवान शंकराच्या मुर्तीचा देखावा साकारला आहे. भव्य अशी ध्यानस्थ शंकराची मुर्ती भाविकांचे लक्ष वेधत आहे. भाजपाचे अनिल मोहिते पाटील यांच्या संकल्पनेतून हा देखावा साकारण्यात आला आहे. रात्री मुर्तीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, भगवान शंकर साक्षात अवतरल्याचा भास या देखाव्यातून होत आहे. हा देखावा पाहण्यासाठी केडगावसह शहर व पंचक्रोशीतील भाविक गर्दी करत आहे. तसेच प्रतिष्ठानच्या माध्यमातून गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष सुजय अनिल मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. या उपक्रमासाठी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहे.

## श्री एकदंत गणेश मंडळाच्या पाककला स्पर्धेत कु.गाजेंगी, कु.बोड्डू, सौ.पब्बा, सौ.इराबत्तीन विजयी

नगर - गणेश उत्सव निमित्त एकदंत कॉलनी, दातरंगे मळा येथील श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ७२ महिलांनी वेगवेगळे खाद्य पदार्थ तयार करून या स्पर्धेत सादर केले. पाककला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. संयुक्ता गाजेंगी (ब्रेड सॅण्डविज), द्वितीय क्रमांक कु.शिवानी बोड्डू (बर्डनेस्ट), तृतीय क्रमांक सौ. वंदना पब्बा (भोफळाचा हलवा) चौथा क्रमांक कु. मयुरी इराबत्तीन (व्हेज पापड समोसा), पाचवा क्रमांक सौ.रुपाली इराबत्तीन (व्हेज कबाब) यांना मिळाला.



श्री एकदंत गणेश मंडळाच्या पाककला स्पर्धेस मिळालेला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग.

या स्पर्धेचे परीक्षण मंडळाच्या २० कार्यकर्त्यांनी सर्व पदार्थांची चव घेवुन गुण (मार्क) दिले. ज्या स्पर्धकाला जास्त गुण (मार्क) मिळाले ते या स्पर्धेत विजयी घोषित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन सुंकी, विनीत इराबत्तीन, यांनी केले तर आभार प्रदर्शन ओंकार बुरगुल, यश मंचे, अमर सादुल यांनी केले.

